डिप्लोमा इन ३डी एनिमेशन एंड ग्राफीक्स
इंफोरमेशन टेक्नोलॉजी (IT) इक्वीव्हॅलेंट (MSBTE EQUIVALENCE)
हॅन्ड्स ऑन प्रॅक्टिकल ट्रेनिंग ग्राफिक्स डिझाईन, एडिटिंग, ॲनिमेशन, गेम इंजिन, स्पेशल इफेक्ट्स,फिल्म कम्पोझिटिंग, एडिटिंग आणि UX / UI Design, AR / VR Game Design, Generative AI
अधिक माहीती साठी संपर्क साधा : 9821473895 / 8291437525

डिप्लोमा इन रोबोटीक्स एंड मेकेट्रोनिक्स
मेकॅनिकल इंजिनीअरींग साठी (MSBTE EQUIVALENCE)
प्रात्यक्षिकांवर आधारीत मेकाट्रोनिक्स, रोबोटीक्स, ऑटोमेशन आणि एम्बेडेड सिस्टम्स, डिझाईन एंड डेव्हलपमेंट प्रशिक्षण दिले जाते.

अधिक माहीती साठी संपर्क साधा : 9819495547 / 9833292670
रजीस्ट्रेशन लिंक https://idemi.org/training/aicte
आयडीईएमआय, इरर्ल्न एक्सप्रेस हायवे, बुन्नाभाटी सायन, मुंबई
फोन.: ०२२ २४०४७५४१/२/३/४ EXTN.५, २१३ / Email: training@idemi.org | Website: www.idemi.org

चुकीच्या प्रकारे दात घासल्याने हिरड्यांचे नुकसान

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : दात घासणे ही रोजची सवय असली तरी अनेक जण चुकीच्या पद्धतीने दात घासतात करतात. त्यामुळे दात आणि हिरड्यांचे नुकसान होऊ शकते, असा इशारा दंततज्ज्ञांनी दिला आहे. त्यांच्या मते, दात जोरात आडव्या दिशेने घासू नयेत. त्याऐवजी हलक्या हाताने गोलाकार पद्धतीने दात स्वच्छ करावेत. ब्रश केल्यानंतर लगेच चूळ भरू नये, असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे टूथपेस्टमधील उपयुक्त घटक दातांवर टिकत नाहीत आणि त्यांचा फायदा कमी होतो.

तज्ज्ञांच्या मते, नेहमी मऊ ब्रिस्टल्स असलेला टूथब्रश वापरावा. कडक किंवा मध्यम ब्रिस्टल्समुळे दातांच्या इनॅमलची झीज होऊ शकते आणि हिरड्या मागे सरकू शकतात. तसेच टूथब्रश दर तीन महिन्यांनी बदलणे आवश्यक आहे. चुकीच्या पद्धतीने ब्रश केल्याने दात आणि हिरड्यांना कायमस्वरूपी इजा होऊ शकते. ब्रश केल्यानंतर लगेच गुळण्या किंवा माउथवॉश वापरणेही टाळावे.

तज्ज्ञांच्या मते, केवळ ब्रश करणे पुरेसे नसते. दातांच्या फटी स्वच्छ ठेवण्यासाठी फ्लॉस, इंटरडेंटल ब्रश आणि नियमित दंत तपासणी व स्केलिंग करणेही महत्त्वाचे आहे. तज्ज्ञांनी तोंडाच्या आरोग्याचा संबंध संपूर्ण शरीराच्या आरोग्याशी असल्याचे सांगितले. हिरड्यांचे आजार वाढल्यास हृदयरोग, स्ट्रोक आणि काही मेंदूविकारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे दात आणि हिरड्यांची योग्य काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

सरकारला कांदा मिळेना

खुल्या बाजारातील जास्त दरांमुळे शेतकऱ्यांची सरकारी केंद्रांकडे पाठ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : दर स्थिरीकरण निधी योजनेंतर्गत केंद्र सरकारने गेल्या दीड महिन्यांत कांदा खरेदीच्या दरात तब्बल सात वेळा वाढ करूनही शेतकऱ्यांनी ह्यानाफेडह्न आणि ह्यएनसीसीएफह्न त्या खरेदी केंद्रांकडे पूर्णपणे पाठ फिरवली आहे. सुरुवातीला प्रति क्विंटल अवघा १२३५ रुपये असणारा सरकारी दर आता २१२५ रुपयांवर पोहोचला आहे. मात्र, तरीही शेतकऱ्यांनी या केंद्रांवर जणू अघोषित बहिष्कारच टाकल्याचे चित्र असून, यामुळे सरकारला कांदा खरेदीचे निर्धारित लक्ष्य गाठणे कठीण झाले आहे.

केंद्र सरकार दर स्थिरीकरण निधी योजनेंतर्गत कमी दरात कांदा खरेदी करून भविष्यातील दरवाढ रोखण्यासाठी आणि देशांतर्गत बाजारात पुरवठा वाढविण्यासाठी त्याचा वापर करते. मात्र, शेतकऱ्यांनी नाफेड आणि एनसीसीएफला कांदा न देता खुल्या बाजारात विक्री करावी, या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाल्याचा दावा महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने केला आहे. यामुळे नाफेड आणि एनसीसीएफला यंदाचे खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण करता येईल का, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत शनिवारी कांद्याला किमान ८०० रुपये, कमाल २,७०० रुपये, तर सरासरी २,२५१ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. या दिवशी ६,३४८ क्विंटल कांद्याची आवक झाली. मागील काही दिवसांपासून बाजारातील सरासरी दर २,२०० रुपयांच्या आसपास आहेत.

बाजारातील वाढते दर लक्षात घेऊन केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाने शनिवारपासून उन्हाळ कांद्याच्या सरकारी खरेदीसाठी २,१२५ रुपये प्रतिक्विंटल दर निश्चित केला. मात्र हा दरही बाजार समितीतील सरासरी दरापेक्षा कमी असल्याचे चित्र आहे.

सरकारने १५ मे रोजी १,२३५ रुपये प्रतिक्विंटल दराने नाफेड आणि एनसीसीएफमार्फत कांदा खरेदी सुरू केली होती. त्यासाठी थेट कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये खरेदी केंद्रे उभारण्यात आली. बाजारातील परिस्थितीनुसार खरेदीदरात वारंवार वाढ करण्यात आली. मात्र, यंदा शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळालेला नाही.

सरकारी खरेदी प्रक्रिया किचकट असून त्यामध्ये केवळ चांगल्या दर्जाच्या कांद्याची खरेदी केली जाते. त्यालटल व्यापारी सर्व प्रकारचा माल खरेदी करून तत्काळ पैसे देतात. त्यामुळे शेतकरी खुल्या बाजारालाच प्राधान्य देत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. दरम्यान, सरकारला दोन लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करावयाचा आहे. बाजारात कांद्याचे दर एक हजार रुपयांच्या आसपास असताना सरकारने अडीच हजार रुपये प्रतिक्विंटल दर जाहीर केला असता, तर शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असता, असे मत लासलगाव बाजार समितीचे माजी सभापती जयदत्त होळकर यांनी व्यक्त केले. या संदर्भात नाफेडच्या अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क साधूनही प्रतिसाद मिळाला नाही.

वाघांच्या संवर्धनासाठी नवी रणनीती

(पान १ वरून) प्रकल्पाच्या पाच दशकांच्या यशानंतर वाघांच्या वाढत्या संख्येमुळे निर्माण होत असलेल्या नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी हा आराखडा तयार केला. जगातील ७० टक्के वाघ भारतात आहेत. २०२२ च्या अहवालानुसार भारतात तीन हजार ६८२ वाघांची नोंद आहे. मात्र, वाढत्या संख्येसोबत अधिवासांची जोडणी, जनुकीय सुरक्षितता, रोगनियंत्रण आणि संघर्ष व्यवस्थापन ही नवीन आव्हाने आहेत. त्यामुळे आता व्याघ्र संवर्धनाचा भर केवळ संरक्षणापुरता मर्यादित न राहता त्यांच्या व्यवस्थापनावर असणार आहे. या व्यवस्थापनात अधिवास पुनर्स्थापना, भक्ष्यवृद्धी, वन्यजीव मार्गिकेचे संरक्षण, स्मार्ट हरित पायाभूत सुविधा आणि स्थानिक समुदायांचा सहभाग यांचा समावेश आहे.

आराखड्यात व्याघ्र संवर्धनासाठी तीनस्तरीय यंत्रणा सुचविली आहे. त्यात अधिवास व भक्ष्यसुरक्षा, मानव-वाघ संघर्ष कमी करणे, मृत्यूदर व रोगांवर नियंत्रण, तसेच हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील टिकाव यांचा समावेश आहे. वाघांच्या संरक्षणासाठी केवळ व्याघ्र प्रकल्पांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण भूदृश्य पातळीवर संवर्धनाची रणनीती राबवण्यावर भर दिला आहे. या आराखड्यातील महत्त्वाची बाब म्हणजे देशातील प्रत्येक व्याघ्र प्रकल्पातील वाघ संख्या, भक्ष्यघनता आणि अधिवासाच्या गुणवत्तेनुसार वर्गीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व प्रकल्पांसाठी एकच धोरण न राबवता त्या-त्या क्षेत्राच्या गरजेनुसार व्यवस्थापन करता येणार आहे. काही क्षेत्रांत अधिवास सुधारणा, काही ठिकाणी भक्ष्यवृद्धी, तर काही ठिकाणी वाघांच्या पुनर्स्थापनेसारखे उपाय राबविले जाणार आहेत.

'सोर्स-रिसिपियंट नेटवर्क'ची संकल्पना या आराखड्यात आहे. ज्या व्याघ्र प्रकल्पांमध्ये वाघांची संख्या स्थिर आणि भरभराटीची आहे, तेथून योग्य अधिवास असलेल्या क्षेत्रांत वैज्ञानिक निकषांनुसार वाघांचे स्थलांतर करण्याची तरतूद आहे. मात्र, अशा हस्तक्षेपांपूर्वी अधिवास, भक्ष्य, संरक्षण आणि संपर्कमार्ग यांची खातरजमा आवश्यक असेल, असे स्पष्ट केले आहे. संवर्धनाची दिशा ठरविणारा हा रोडमॅप महत्त्वाचा मानला जात आहे.

अपघातात जखमी तरुणाचा मृत्यू

नागपूर : वानाडोंगरी येथील संगम मार्गावर भरधाव बोलेरो पिकअपने दिलेल्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा शनिवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. शैलेश दालीराम भुरे (२३, रा. एकात्मता नगर), असे मृताचे नाव आहे. १ जुलैला सकाळी संगम मार्गावरील दंत महाविद्यालयाजवळ त्याला बोलेरो पिकअप वाहनाने धडक दिली होती. गंभीर जखमी शैलेशवर रुग्णालयात उपचार सुरू होते. शनिवारी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. एमआयडीसी पोलिसांनी बोलेरो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

MBBS

Ministry Of Health Of Russia
SMOLENSK STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA
Invites Indian students for direct Government Admissions
Recognized by India, WHO, USA & UK, Min. Qual. 50% in XII in PCB
Satisfies all requirements of NMC of India

UNIVERSITY – 106 years old Medical University. The University is situated in the center of the Smolensk city. Smolensk is situated 380 km west of Moscow. Very high standards of education, strict disciplinary system. **2400** Indian students (**1100** Girls) studying, **275** got degree in **2026**. Duration 6 years including internship and License. English Medium in all years, Closed type campus system, **8** attached hospitals (**9000** Beds).
MCI SCREENING TEST – Our graduates of **2008** to **2025** have given **BEST** results among graduates of all foreign medical colleges (Official web sites of Indian Embassy, Moscow and NBC conducting Screening Test confirm this).
SPECIAL HOSTELS ONLY FOR INDIAN STUDENTS (BEST HOSTELS IN RUSSIA) 2 and 4 seated big rooms, separate hostels for boys and girls.
INDIAN MESS - Mess with **Indian food** cooked by **Indian cooks**.
Fee (Tuition+Hostel+Med.Ins.) – **USD 6000** (Approx. Rs. 5,75,000/-) per year and one time payment of Rs.1,50,000/- (By Bank Draft only) which includes – Admission procedure, invitation letter, student visa, air ticket Delhi - Moscow.
Scholarship to all Indian students. Bank loans from Indian banks available.
Contact Foreign advisor to Chancellor: Dr.Alok Aeron+79605805555(Russia)
Official web site: www.sgmu.info DM us on insta: @sgmu.info
Admission details: admission.sgmu.live
INFORMATION CENTERS (Parents of Students or Our Graduates):
Nagpur - Mr. Durbule – 9673114020
Yavatmal & Amravati - Dr. Deshmukh – 9422865182
Wardha - Mr. Thool – 9922704127, **Chandrapur** - Mrs. Tajne – 8010868187
Gadchiroli - Mrs. Warbhe – 9096510675, **Akola:** Dr. Kulkarni – 9112255993

स्थापना २००१ — रजि. नं.: ८०१/२००१
जानरंजन क्रीडा बहुउद्देशीय संस्था, पारशिवनी द्वारा संचालित
साईबाबा आर्ट्स अँड सायन्स कॉलेज
ता. पारशिवनी, जि. नागपूर (म.रा.) - ४४११०५

महाविद्यालयातील सत्र २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी बहुप्रतीक्षित तात्पुरता प्रवेश (CHB) अध्यापकांची रिक्त पदे भरण्यासाठी मा. महाविद्यालय उच्च शिक्षण संचालनालय नागपूर यांचा आदेश क्र. उशिएनं/पदभा/नौशायी/ मा.प्र.भ./ई-३४२५४७/२०२६ दिनांक: ०२/०७/२०२६ नुसार खालील पदे तासतुत्पन्न बहुप्रतीक्षित तात्पुरता (CHB) तत्वावर भरण्यात आल्या-हजर पात्र विनंती आहे.

पाहिजेत (CHB)

अनु.क्र.	विषय	अनुसूचाचा प्रकार	पदे	मुलाखतीचा दिनांक व वेळ
१	गणित	अनुसूचित	०४	दि. ११.०७.२०२६ ला
२	व्यवसायशास्त्र	अनुसूचित	०८	बुधवारी १२.०० ते ०३.०० वाजेपर्यंत
३	भौतिकशास्त्र	अनुसूचित	०६	
४	प्राणीशास्त्र	अनुसूचित	०८	उच्च विद्यावी पूर्ण वेळ निवत पदे भरण्याची प्रक्रिया सुरु असेल तो पदे भरेपर्यंत प.ता. पदांना मान्यता असेल
५	वनस्पतीशास्त्र	अनुसूचित	१०	

विना अनुसूचित तत्वावर (शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता तत्वावर)

१	सुरक्षाशिक्षणशास्त्र	विना अनुसूचित	१	शैक्षणिक अर्हता: १) संबंधित विषयात द्वितीय श्रेणीत पदवी उत्तीर्ण. २) संबंधित विषयात किमान ५५ टक्के गुण घेऊन पदव्युत्तर परीक्षा पास, ३) बी.एड्डी, नेट/सेट किंवा समकक्ष पात्रता, ४) बु.सी.सी. व विद्यार्थांसोबत वेळोवेळी निर्देशित केलेली पात्रता.
२	एम.एस्सी (संगणकशास्त्र)	विना अनुसूचित	१	
३	एम.ए. (इतिहास)	विना अनुसूचित	१	
४	एम.ए. (समाजशास्त्र)	विना अनुसूचित	१	

मुलाखतीचे ठिकाण- साईबाबा आर्ट्स अँड सायन्स कॉलेज, खापरखेडा रोड, पारशिवनी, जि. नागपूर - ४४११०५.
सचिव जानरंजन क्रीडा बहुउद्देशीय संस्था, पारशिवनी, भ्रमणध्वनी - ८९९१२०१८७७

HDFC BANK — मुख्यालय:- एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३. क्षेत्रीय कार्यालय: एचडीएफसी बँक लि., चौथा मजला, फिनायली टॉवर, सराफ चेंबर समोर, बाजेट रोड, सदर, नागपूर, ४४०००१, महाराष्ट्र. — ई-लिलाव विक्री सूचना

अचल मालमत्तांच्या ई-लिलाव विक्रीसाठी जाहीर सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, 2002 मधील नियम 8(6) च्या तसुद्दीसह फायनान्शियल ॲसेट्स ॲन्ड फायनॅन्शियल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (''सर्फेसी ॲक्टमध्ये'') अंतर्गत एचडीएफसी बँक लिमिटेड (''बँक'') करते तारण असलेल्या अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारे सामान्य जनतेस आणि विशेषकरून कर्जदार / सहकर्जदार / जामीनदारांना सूचित करण्यात येते की एचडीएफसी बँक लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी/अधिकाऱ्यांनी खुले नमूद मालमत्तेच्या/मालमत्तांचा ताबा घेतला असून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 मधील अनु. 13(2) अंतर्गत पुढील कर्ज खात्यांसाठी दिनांक 30.09.2021 रोजी गुंतवून जाणे कित्यानंतर सदर तारीखपर्यंत ''जसजसे आहे जेथे आहे, जसे आहे जे काही आहे, येथे जे काही आहे आणि तसेच काही'' तत्वाच्या विक्रीच्या अधिकारासह ताब्या घेतलेल्या आहे आणि त्याअर्थी, थकबाकीच्या भरणा व त्यावरील नियमबाकीच्या सदर तारखेपर्यंतच्या नियम 8 सह वाचण्याच्या वेगळ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत बँकेने निश्चित केलेल्या आरक्षित किमतीवर सदर खालमालांची विक्री करून बँकेच्या थकबाकीची वसूली करण्याचा विचार करीत आहेत. खाली नमूद मालमत्तांची विक्री ई-लिलावाद्वारे पुढील वेब पेजेच्या माध्यमाने केली जाईल: https://www.bankeauctions.com

अचल मालमत्तांचे वर्णन / खात्याचे तपशील / खाते / बचतगा खाते / डे.

शाखेचे नाव व खाते	मालमत्तेचे ग्राहकाकडून/जामीनदारांचे नाव	जाता मालमत्तेचे तपशील	मागणी सूचनेनुसार खाते आणि दिनांक	पाहणी दिनांक आणि वेळ	आरक्षित किंमत / (बचतगा खाते) / बोली वृद्धी खाते	ई-लिलाव दिनांक / वेळ	बोली स्वीकारण्याचा शेवटचा दिनांक	प्राधिकृत अधिकाऱ्याचे नाव / फोन क्र. / ईमेल आयडी
एचडीएफसी बँक लि., कार्टाना (महाराष्ट्र) & ये. सपूर एन्क्लॉव	1. ये. सपूर एन्क्लॉव 2. श्री संदीप देवबंधु वजीरे 3. सपूर संदीप वजीरे	1. श्री संदीप देवबंधु वजीरे यांचे मालकीची व्यवसायिक मालमत्ता दुकान क्र. 2, वस्त्र ठाळ मजला, व्यापार संकुल, प्लॉट क्र. 9, 10, 17 व 18, क्षेत्र सर्वे क्र. 193/1, मौजे कळी, कृषी व्यापार समितीजवळ, कोर्टी नगर, मंगलआंबेडकर चौक, कार्टाना लाइट, तालुका कार्टाना लाइट, जि. यवतीन. पिक्षी खानतुसार चतुर्दांचा: पूर्वेस - दुकान क्र. युनी-3, पश्चिमेस - दुकान क्र. युनी-1, उत्तरेस - सौरव व्यवसाय सर्विस सेंटर, दक्षिणेस -दुकान क्र युनी-8. 2. श्री सपूर संदीप वजीरे यांचे मालकीची व्यवसायिक मालमत्ता, दुकान क्र. 13, तळ मजला, सिल्वर टॉवर, प्लॉट क्र. 35/1, शीट क्र. 18-बी व प्लॉट क्र. 3/2, 4/1 व 7/1, शीट क्र. 19ए, बीजा कार्टाना लाइट, मेन रोड, तालुका कार्टाना लाइट, जि. यवतीन. पिक्षी खानतुसार चतुर्दांचा: पूर्वेस - कॉम्प्लेक्सचा अंतर्गत रस्ता, पश्चिमेस - दुकान क्र. 29, उत्तरेस -दुकान क्र. 12, दक्षिणेस - दुकान क्र. 14. 3. श्री संदीप देवबंधु वजीरे यांचे मालकीची व्यवसायिक मालमत्ता, दुकान क्र. 07, तळ मजला, प्लॉट क्र. 186, नवुन शीट क्र. 26 ए, गुलाबी कॉम्प्लेक्स, सरकार लाईन, तालुका कार्टाना लाइट, जि. यवतीन, महाराष्ट्रीया. पूर्वेस - कॉम्प्लेक्सचा अंतर्गत रस्ता, पश्चिमेस - शासकीय रस्ता, उत्तरेस - कॉम्प्लेक्सचा जिन्ना, दक्षिणेस - श्रीमती सुरुचा कुलदीप यांची जमीन.	क. 85,25,712.16/- सुरुवाची दिनांक- 30.09.2021	18-07-2026 दु. 1:00 ते दु. 3:00 वाजेपर्यंत	मालमत्ता 1. आरक्षित किमत रु. 36,00,000 (रुपये अडतीस लाख फक्त) बचतगा खाता -3,60,000 बोली वृद्धी खाता-50,000 मालमत्ता 2. आरक्षित किमत रु. 18,00,000 (रुपया अठरा लाख फक्त) बचतगा खाता-1,80,000 बोली वृद्धी खाता-50,000 मालमत्ता 3. आरक्षित किमत रु. 8,00,000 (पाच लाख फक्त) बचतगा खाता- 80,000 बोली वृद्धी खाता-50,000	22-07-2026 रोजी दु. 1:00 ते दु. 3:00 वाजेपर्यंत	21-07-2026 रोजी दु. 3:00 वाजेपर्यंत	अमित रंजन सिंग सेंगर 9518344952 Amit.Sengar@hdfcbank.com

*अनुसूत मता क्र. 1 व 3 बँकेच्या प्रत्यक्ष ताब्यात आहेत, परंतु, मालमत्ता क्र. 2 सर्फेसी अधिनियमातील अनु. 13(4) अंतर्गत सांकेतिक ताब्यात आहे.
आटी या शर्ती:
1. ई-लिलाव/''जसी आहे जेथे आहे, जशी आहे जे काही आहे, तेथे जे काही आहे आणि उशव नाही'' तत्वावर संबंधित्या येत आहे.
2. इच्छुक बोलीदारांनी आरक्षण वधाना स्वरूपे तपशील आणि दस्तावेज लॉगिन आयडी व पासवर्ड च्या माध्यमातून https://www.bankeauctions.com (https://www.bankeauctions.com येथे नियुक्त नाव नोंदवून युवर आयडी व पासवर्ड प्राप्त करावा लेहेत) सादर करावेत.
3. वरणा खाण पुढील खातापत्रे एनईएफटी / आरटीजीएस द्वारे जमा करावयाचे ठेव आहे: 57500000904261, खात्याचे नाव: डीएफएसी बँक लि., आरएएसएसी कोड: HDFC0000240. कृपया लक्षात ठवावे की वरणा स्वीकारलेल्या चेक / डिमांड ड्राफ्ट स्वीकारल्या जेणार नाहीत.
4. वरीलप्रमाणे खुलेपत्र नमूद अचल मालमत्ता संदर्भातील तपशील प्राधिकृत अधिकारी / बँकेच्या महितीनुसार देण्यात आलेला आहे. परंतु, सदर तपशिलात काही चूक झाल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही माहत्यात आल्यास त्याबाबतही प्राधिकृत अधिकारी / बँक जबाबदार नसेल. त्यामुळे बोलीदारांनी विनंती आहे की आपले स्वतःचे हित लक्षात घेत आपली बोली सादर करावी सदर अचल मालमत्ता संदर्भातील इत्थं संबंधित तपशील / भौतिक महिती, बंधनस्त आणि मालमत्ता तह इ. याचा स्वतंत्रपणे चौकशी करावी आणि स्वतःची खात्री करून घ्यावी. मालमत्तांची पाहणी वर नमूद दिनांक व वेळेच्या करता येईल.
5. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या महितीनुसार उपलब्धतेवर आणि या उद्दीष्टाच्या नमूद अचल मालमत्तेसंदर्भात इतर बोलणाऱ्यांशी मालमत्तेवर बँकेच्या रेकर्डीनुसार तपशीलावर आहे व प्रतीक्षेचे नमूद एका मालमत्तेसंदर्भात इतर मालमत्तांवर मालमत्ता कोरे, सोसायटीची थकबाकी इ. सारख्या वैयक्तिक थकबाकीसाठीदेखील जोने नाहीत. परंतु, बोलणाऱ्यांनी सर्वांना / मागी/चाची थकबाकी विषय-वैयक्तिक थकबाकी / वैयक्तिक थकबाकी / बोने / कराची थकबाकी इ. साठी बँक जबाबदार नसेल. इच्छुक बोलीदारांनी बोलेने, मालमत्तेचा मालकी हक्क इ. याचा स्वतंत्रपणे चौकशी करावी आणि स्वतःची खात्री करून घ्यावी. मालमत्तांची पाहणी वर नमूद दिनांक व वेळेच्या करता येईल.
6. ज्या इच्छुक बोलीदारांनी वरणा खाण नमोरली आणि आणि ज्यांना तपशील लागेल त्यांनी दिनांक 17 जुलै 2026 रोजी दु. 4 वाजता सदर हजी आणि आणि त्यांनी कृपया ये. सी1 इंडिया प्रा.लि., प्लॉट क्र. 301, गल्फ पेट्रो केम बिल्डिंग, उद्योग विहार फेज 2, गुडगाव, येथे संपर्क साधावा. हेल्पलाईन क्र.: 0124-4302020/21/22/23/24, ही विनंतीचा कृपाशीर्वादाने क्र. 7080804466 वर संपर्क साधावा. हेल्प लाईन ई-मेल आयडी: support@bankeauctions.com आणि मालमत्तेसंबंधित बोलणाऱ्यांची चौकशीसाठी कृपया वर नमूद संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांची कामकाजाच्या दिवशी कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा (सा. 10 ते सायं. 5 वाजेपर्यंत).
7. सर्वोच्च बोली ही एचडीएफसी बँक लिमिटेड च्या मंजुरीच्या अधीन असेल. बोलणारी कारण न देता प्राप्त होणारी बोलणारी किंवा सर्वच बोली / प्रस्ताव स्वीकारण्याचा / फेटाळण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवतात. त्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.
8. सदर सूचनेच्या मजकूराबाबत वाद / बेजोबंधी यात सूचित करण्याबाबती आणखी एक जाहीर सूचनेचा प्रकाशित करण्यात येईल असे नमूद त्यायवत बँकेच्या वेबसाईटवर सूचित करण्यात येईल किंवा बँक ठरवेल त्या बोलण्याही पद्धतीने कळविण्यात येईल.
9. (विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया आमच्या वेबसाईटला www.hdfcbank.com आणि www.bankeauctions.com येथे भेट द्यावी.)

सर्फेसी अधिनियम, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत:इलेक्ट्रॉनिकरीत्या विक्री सूचना

कृपया ही वर नमूद कर्ज खात्याच्या कर्जदार / आणि जामीनदारांसाठी असलेलीही वर नमूद दिनांकाला ई-लिलाव दखविण्याच येणार असल्याची सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्याचा वेगळाच नियम 8(6) अंतर्गत सूचना समजण्यात यावी. कर्जदार / जामीनदार / महत्त्वाकार यांना सूचित करण्यात येते की त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे स्वतंत्र अद्यायवत ब्याज आणि आनुषंगिक खर्चासह सदर सूचनेच्या / लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसांपर्यंत आत परतावा करावा, अन्यथा मालमत्तेसंदर्भ विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक सीलिलाव ही ब्याज व खुल्लकोर वसूल करण्यात येईल.

दिनांक: ०५.०७.२०२६ स्थान:कार्टाना — प्राधिकृत अधिकारी एचडीएफसी बँक लिमिटेड

HINDUJA LEYLAND FINANCE

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड

कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): यू६५९९३एमएच२००८पीएलसी३८४२२१
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. सी-२१, टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१
कॉर्पोरेट कार्यालय: २एए, डेव्हलप्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई, तामिळनाडू - ६०००३२
टेली.: (०४४) २२४२७५२५; **वेबसाईट:** https://hindujaleylandfinance.com/;
ईमेल: investorrelations@hindujaleylandfinance.com

नमुना क्र. सीएए.२

[कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३०(३) आणि कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ व ७ च्या अनुषंगाने]

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांचे समक्ष
कंपनी योजना अर्ज सी.ए. (सी.ए.ए.) /१०७/एमबी/२०२६

कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात
आणि
कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ सह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या प्रकरणात
आणि
हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड आणि एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड)
आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण योजनेच्या प्रकरणात

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींतर्गत स्थापित कंपनी आणि)
कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत अस्तित्वात असलेली कंपनी, नोंदणीकृत कार्यालय, प्लॉट क्र. सी-२१,)
टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५१.)
CIN: यू६५९९३एमएच२००८पीएलसी३८४२२१) .....पहिली अर्जदार कंपनी / हस्तांतरकर्ता कंपनी

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड च्या असुरक्षित धनकोंची सभा घेण्यात येणार असल्याची सूचना व सूचनेची जाहिरात

याद्वारे **सूचित** करण्यात येते की माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (**''माननीय न्यायाधिकरण''**) यांनी कंपनी योजना अर्ज क्र. सी.ए. (सीएए)/१०७/एमबी/२०२६ मध्ये पारित केलेल्या दि. १७ जून, २०२६ च्या आदेशान्वये (**''आदेश''**) त्यांनी इतर बाबींशिवाय असे निर्देश दिले की **हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड** (**'हस्तांतरकर्ता कंपनी''** किंवा **''कंपनी''**) च्या सुरक्षित धनकोंची सभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग किंवा इतर दृकश्राव्य पद्धतीनी (**''व्हीसी/ओएएिएम''**), (**''सभा''**) घेण्यात यावी त्याची ज्यात हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड ते एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण करण्याची प्रस्तावित योजना (**''योजना''**) विचारात घेण्यात यावी, आणि योग्य वाटत असल्यास, बदलांसह किंवा बदलांशिवाय मंजूर करण्यात यावी.

माननीय एनसीएलटी यांचा सदर आदेश आणि त्यातील निर्देशांच्या अनुषंगाने कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ आणि त्याअंतर्गत इतर लागू नियमांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ (**''अधिनियम''**) मधील तरतुदींचे, आणि व्हीसी/ओएएिएम च्या माध्यमातून आमसभा घेण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने जारी केलेल्या लागू सामान्य परिपत्रकांचे पालन करीत असुरक्षित धनकोंची आमसभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता घेण्यात येणार आहे आणि इंस्टीट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मीटींग (''SS-2'') आणि सदर नियमांसह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियामातील लागू तरतुदींचे पालन करीत असुरक्षित धनकोंना ई-मतदान सुविधा देण्यात येणार आहे. ही सभा व्हीसी/ओएएिएम च्या माध्यमातून राबविण्यात येणार असल्याने समभागधारकांनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही.

कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि दि. ०४ जुलै, २०२६ रोजीच्या सदर सूचनेची संबंधित जोडपत्रे यांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १०२ आणि सदर अधिनियमातील इतर लागू तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद २३०(३) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार दि. २६ जून, २०२६ रोजी च्या सभ

WWW.LOKSATTA.COM लोकसत्ता

अमेरिकेच्या सामन्यात प्रेक्षकसंख्येचा विक्रम

न्यूयॉर्क : अमेरिकेने बोत्सिन्या-हर्जेगोविनाविरुद्ध विजय मिळवत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. या सामन्याने अमेरिकेत इंग्रजी भाषेतील फुटबॉल प्रसारणाच्या इतिहासात सर्वाधिक प्रेक्षकसंख्येचा विक्रम नोंदवला. फॉक्स स्पोर्ट्सनुसार, हा सामना २ कोटी ४४ लाख प्रेक्षकांनी पाहिला. २००२ नंतर अमेरिका संघाचा हा विश्वचषक बाद फेरीतील पहिला विजय ठरला. या सामन्याने २०१५च्या 'फिफा' महिला विश्वचषक अंतिम सामन्याचा २ कोटी २३ लाख प्रेक्षकांचा विक्रम मोडला. अमेरिकेत इंग्रजी व्यतिरिक्त अन्य भाषांतही प्रसारण केले जाते.

१३ ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध इंग्लिश मोहम्मद हानी याच्याकडून स्वयंगोल झाला. यंदाच्या विश्वचषकातील हा विक्रमी १३वा स्वयंगोल ठरला. याआधी २०१८ विश्वचषक स्पर्धेत १२ स्वयंगोल झाले होते.

अतिरिक्त वेळेतील स्वयंगोल अर्जेंटिनाच्या पथ्यावर

केप व्हर्डेपुढे जगज्जेत्यांचाही संघर्ष

वृत्तसंस्था, मियामी

स्पेनविरुद्धची ऐतिहासिक बरोबरी, गटातून दमदार आगेकुच आणि बाद फेरीतील संस्मरणीय खेळ अशा स्वप्नवत प्रवासानंतर केप व्हर्डेचे पदार्पणाच्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील आव्हान अखेर संपुष्टात आले. मात्र, 'राउंड ऑफ ३२'च्या लढतीत त्यांनी गतविजेत्या अर्जेंटिनाला दिलेला लढा आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील या छोट्याशा बेटाची फुटबॉल प्रतिभा जगाला दाखविण्यासाठी पुरेसा ठरला. स्पर्धेत सर्वाधिक चर्चेत असलेला केप व्हर्डेचा गोलरक्षक वोझिन्याने लिओनेल मेसीसह अर्जेंटिनाच्या अन्य आक्रमकांचे तब्बल आठ फटके लीलया परतवून लावले. मात्र, अतिरिक्त वेळेत झालेल्या स्वयंगोलमुळे केप व्हर्डेची निराशा झाली आणि अर्जेंटिनाने ३-२ असा निसटता विजय मिळवत उपउपांत्यपूर्व फेरी गाठली.

क्रमवारीत ६४व्या स्थानावर असलेल्या केप व्हर्डेने दोन वेळा पिछाडीवरून पुनरागमन करत अर्जेंटिनाशी बरोबरी साधली. विश्वचषक इतिहासातील सर्वात मोठ्या धक्क्यांपैकी एक नोंदविण्याच्या उंबरठ्यावर हा संघ पोहोचला होता. मात्र, अखेरीस १११व्या मिनिटाला मेसीने घेतलेल्या कॉर्नर किकवर ख्रिस्तियन रोमेरोच्या हेडरला केप व्हर्डेचा खेळाडू डिनेय बोर्जेसचा हलकासा स्पर्श झाला आणि चेंडू स्वतःच्याच जाळ्यात गेला. या स्वयंगोलमुळे अर्जेंटिनाला निर्णायक आघाडी मिळाली आणि अखेर त्यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले.

मेसीचीच जादू

२० केप व्हर्डेविरुद्ध मेसीने अर्जेंटिनाचे गोलस्राव्ते उघडले. विश्वचषक कारकीर्दीतील २०वा गोल. अशी कामगिरी करणारा पहिला खेळाडू.

८ विश्वचषक स्पर्धेत सलग आठ सामन्यांत गोल करणारा पहिला खेळाडू.

मेसीमुळे आघाडी

सामन्याच्या सुरुवातीपासून अर्जेंटिनाने आक्रमक खेळ केला. २९व्या मिनिटाला लिसांद्रो मार्टिनेझच्या लांब पासवर मेसीने अप्रतिम नियंत्रण मिळवत शानदार फटका मारला आणि चेंडू थेट जाळ्यात घाडला. मेसीचा विश्वचषक कारकीर्दीतील हा २०वा, तर यंदाच्या स्पर्धेतील सातवा गोल ठरला. या गोलनंतर अर्जेंटिनाने वर्चस्व राखले होते. मात्र, पूर्वार्ध संपेपर्यंत त्यांना गोलसंख्येत वाढ करता आली नाही.

डुआर्टेमुळे बरोबरी

उत्तरार्धात केप व्हर्डेने सामन्याचा रंगच बदलून टाकला. डेरॉंग डुआर्टेने बॉक्समध्ये अचूक धाव घेत लिसांद्रो मार्टिनेझच्या पायांमधून जोरदार फटका मारत गोल केला. अर्जेंटिनाचा गोलरक्षक एमिलियानो मार्टिनेझला चकवत चेंडू जाळ्यात गेल्यानंतर स्टेडियममधील केप व्हर्डेच्या समर्थकांनी जोरदार जल्लोष केला. अर्जेंटिनाला आघाडीची संधी होती, पण वोझिन्याने त्यांना हताश केले.

अतिरिक्त वेळेत थरार

नियमित ९० मिनिटांनंतर सामना १-१ असा बरोबरीत राहिल्याने अतिरिक्त वेळ खेळवण्यात आली. अतिरिक्त वेळेच्या दुसऱ्याच मिनिटाला ॲलेक्सिस मॅक ॲलिस्टरच्या कॉर्नरवर लिसांद्रो मार्टिनेझने उजव्या कोपऱ्यातून जोरदार किकसह चेंडू गोलजाळ्यात मारला आणि अर्जेंटिनाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. परंतु केप व्हर्डेने हार मानली नाही. १०३व्या मिनिटाला सिडनी लोपेस काब्रालने डाव्या बाजूने आत येत अप्रतिम कर्लिंग शॉट मारला. एमिलियानो मार्टिनेझच्या डोक्यावरून चेंडू थेट गोलच्या वरच्या कोपऱ्यात जाऊन विसावला. या गोलने केप व्हर्डेला बरोबरी करून दिली. मात्र, अतिरिक्त वेळेच्या उत्तरार्धात स्वयंगोलमुळे केप व्हर्डेला पराभव पत्करावा लागला.

कोलंबियाचे सातत्य कायम; घानावर मात

वृत्तसंस्था, कॅन्सस सिटी

विश्वचषक उपउपांत्यपूर्व फेरी आजचे सामने

- ब्राझील वि. नॉर्वे **वेळ : मध्यरात्री १.३० वा. (सोमवार)**
- इंग्लंड वि. मेक्सिको **वेळ : सकाळी ५.३० वा. (सोमवार)**
- थेट प्रक्षेपण : 'युनाइटट स्पोर्ट्स', 'झी ५'

प्रखर उष्णतेत खेळल्या गेलेल्या सामन्यात जॉन अरियासच्या पूर्वार्धातील निर्णायक गोलच्या जोरावर कोलंबियाने घानाचा १-० असा पराभव करत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. साखळीत दोन विजय आणि पोर्तुगालविरुद्ध बरोबरीची नोंद करणाऱ्या कोलंबियाने बाद फेरीतही हेच सातत्य कायम राखत जेतेपदासाठी दावेदारी अधोरेखित केली आहे.

रात्री उशिरापर्यंत ३० अंश सेल्सियसपेक्षा अधिक तापमान असतानाही नेस्टोर लॉरेन्झो यांच्या मार्गदर्शनाखालील कोलंबियाने संपूर्ण सामन्यावर वर्चस्व राखले. विजयाचा फरक केवळ एका गोलचा असला, तरी प्रत्यक्षात कोलंबियाने अनेक संधी निर्माण केल्या आणि घानाला कायम दडपणाखाली ठेवले. कोलंबियाने सलग तिसऱ्या सामन्यात प्रतिस्पर्ध्याला गोल करण्यापासून रोखले. आता पुढील फेरीत त्यांची स्विट्झर्लंडशी गाठ पडणार आहे.

घानाचे आक्रमण संपूर्ण स्पर्धेत निराशाजनक ठरले. चार सामन्यांमध्ये मिळून घानाने एकूण केवळ चार फटकेच लक्ष्याच्या दिशेने मारले. या विश्वचषकात इराकनंतर हा दुसरा सर्वात खराब आकडा ठरला. याउलट, कोलंबियाने या एकाच सामन्यात घानाच्या संपूर्ण स्पर्धेतील कामगिरीपेक्षा दुप्पट फटके लक्ष्यावर मारले.

दुखापतीचा फटका

सुरुवातीच्या दहा मिनिटांत दोन्ही संघांना दुखापतींचा मोठा फटका बसला. कोलंबियाचा आघाडीचा खेळाडू जॉन कॉर्डोबा याला स्नायूची दुखापत झाल्याने त्याला मैदान सोडावे लागले. दुसरीकडे घानाचा उजवा बचावपटू मार्विन सेनाया पायाच्या दुखापतीमुळे बाहेर पडला.

अरियासची चमक

कॉर्डोबाच्या जागी आलेल्या लुईस सुआरेझने १४व्या मिनिटाला उजव्या बाजूने वेगवान धाव घेत अचूक क्रॉस दिला. दूरच्या पोस्टजवळ असलेल्या अरियासने यावर अप्रतिम व्हॉली मारत चेंडू जाळ्यात धाडला. घानाचा बचावपटू सेइदूचे अरियासकडे दुर्लक्ष झाले आणि बचावातील ही चूक त्यांना महागात पडली.

गोल स्वीकारल्यानंतर घानाने काही प्रमाणात आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. मँचेस्टर सिटीचा आक्रमक अँटोईन सेमेन्योचा फटका बचावपटूला लागून बाहेर गेला. संपूर्ण स्पर्धेत त्याला एकदाही लक्ष्यावर फटका मारता आला नाही. मध्यंतरानंतरही कोलंबियाचेच वर्चस्व राहिले आणि त्यांनी सहज विजय नोंदवला.

सूर्यवंशीच्या पदार्पणातही भारत अपयशी

मँचेस्टर : तडाखेबंद युवा सलामीवीर वैभव सूर्यवंशीला अखेर आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी मिळाली. त्याने (१५ वर्षे ९९ दिवस) भारताचा सर्वात युवा पदार्पणवीर म्हणून सचिन तेंडुलकरचा (१६ वर्षे २०५ दिवस) विक्रमही मोडला. मात्र, सूर्यवंशीच्या समावेशानंतरही भारतीय संघाची निराशाजनक कामगिरी सुरूच राहिली. दुसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात शनिवारी यजमान इंग्लंडने भारताला चार गडी राखून पराभूत केले.

डावखुऱ्या सूर्यवंशीने दोन उत्तुंग षटकारांसह १० चेंडूत १४ धावा केल्या. मात्र, विल जॅक्सच्या गोलंदाजीवर क्रीजबाहेर येऊन मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात तो यष्टिचित झाला. इशान किशन (४९), अभिषेक शर्मा (४३), कर्णधार श्रेयस अय्यर (३७) आणि तिलक वर्मा (नाबाद २४) यांच्या योगदानामुळे भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ० बाद १९० अशी धावसंख्या उभारली.

याचा पाठलाग करताना इंग्लंडने एका धावेत सलामीवीर गमावले. परंतु जेकब बेथलने (४६ चेंडूंत नाबाद ७६) उत्कृष्ट फलंदाजी केली. त्याला कर्णधार हॅरी ब्रूक (३९) आणि टॉम बँटन (३९) यांची साथ लाभल्याने इंग्लंडचा विजय शक्य झाला. इंग्लंडने १९ षटकांत ६ बाद १९१ धावा केल्या.

इजिप्तची अचूकता निर्णायक

अलिग्टन : इजिप्तने 'पेनल्टी शूटआऊट' मधील अचूक कामगिरीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाला नमवत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. शूटआऊटपूर्वी ऑस्ट्रेलियाने गोलरक्षक बदलण्याचा निर्णय घेतला. पॅट्रिक बिचच्या जागी अनुभवी मॅट रायनला मैदानावर उतरविण्यात आले. मात्र, रायनला एकही फटका अडवता आला नाही. निर्नायम आणि अतिरिक्त वेळेतील १-१ अशा बरोबरीनंतर 'पेनल्टी शूटआऊट'चा अवलंब करण्यात आला. यात इजिप्तने ४-२ अशी बाजी मारली.

मध्य रेल्वे
पुणे मंडळ
NOTICE FOR INVITING
E-TENDER: 91265110B
वरिष्ठ विभागीय समाही व्यवस्थापक, पुणे, हे भारताच्या राष्ट्रपतींच्या करिता आणि त्याच्या वतीने कामगत असून त्यांनी खालीलप्रमाणे IREPS पोर्टल www.ireps.gov.in वर ई-निविदा आमंत्रित केल्या आहे. बोलीदारांचे त्यांच्या मूळ / मुद्रांकित बोली केवळ अंतिम तारखेपर्यंत आणि वेळेपर्यंत सादर करता येतील. वर्णन : लातूर यजनवी लिमिटेड वॅटरी टॅम्पिंग मशीन, एक संच ज्यामध्ये २ टेम्पर्स आहेत. संख्या : 29 सेट. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ : 31.07.2026 रोजी सकाळी 11:30 पर्यंत.
AK-46 व. वि. सा. व्य., पुणे
सुरक्षित प्रवास करा, फुटओव्हरब्रिज प्रवास करणे टाळा

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे
श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-३७
जाहीर सूचना
श्री. छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड गुलटेकडी पुणे येथील फळे भाजीपाला विभागातील गाळा क्रमांक ४९८ हा मै. हिमानाथ आणि कंपनी तर्फे भागीदार १)श्री.नारायण निवृत्ती केदारी २)कै.गोविंद निवृत्ती केदारी यांचे निधनानंतर त्यांनी मृत्युपूर्वी करून ठेवलेल्या नोंदणीकृत मृत्युपत्राचे आधारे श्री. हिरामण गोविंद केदारी यांचे नावाची सदर गाळ्यावर नोंद होणेपूर्वीच त्यांचे निधन झालेने त्यांचे हिस्सात १)श्री.रत्नाकर हिरामण केदारी २)सौ.भावना अशोक घायतकर ३)सौ.पौर्णिमा दिपक कुदळे४) कु. काव्या अमर सिंदे यांचे नावाची नोंद करणेत आली होती त्यापैकी, हिरामण गोविंद केदारी यांचे नावाची सदर गाळ्यावर नोंद होणेपूर्वीच त्यांचे निधन झालेने त्यांचे हिस्सात १)श्री.नारायण निवृत्ती केदारी यांनी त्यांचा सदर गाळ्यामधील असलाला ५० टक्के अर्धा मालकी हक्क / हिस्सा तसेच कु. काव्या अमर सिंदे यांना वारसहक्कने प्राप्त झालेला वारसाहक्क / अविभक्त हिस्सा नोंदणीकृत हक्कसोडपत्रान्वये १)श्री.रत्नाकर हिरामण केदारी २) सौ.भावना अशोक घायतकर ३)सौ.पौर्णिमा दिपक कुदळे लाभार्त असलेला सोडलेला आहे. त्यामुळे सदर गाळ्यावरील मे. हिमानाथ आणि कंपनी हे भर्ती नाव कमी करून श्री. नारायण निवृत्ती केदारी यांचा मालकी हक्क / हिस्सा तसेच कु. काव्या अमर सिंदे यांचा वारसा हक्क / अविभक्त हिस्सा कमी करून १) श्री. रत्नाकर हिरामण केदारी २) सौ.भावना अशोक घायतकर ३) सौ.पौर्णिमा दिपक कुदळे लाभार्त असलेला आहे. त्यामुळे सदर गाळ्यावरील मे. हिमानाथ आणि कंपनी हे भर्ती नाव कायम ठेवणेकरिता संबंधितांनी या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.
तरी, या नोंदीबाबत कोणाची काही तक्रार/ हरकत असल्यास, ही जाहीर सूचना प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसांत कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे यांचे कार्यालयामध्ये लेखी स्वरूपात कळवावे. त्यानंतर कोणतीही तक्रार/ हरकत विचारात घेतली जाणार नाही.
सचिव, समापती,
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

HINDUJA LEYLAND FINANCE
हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड
कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): यू६५९९३एमएच२००८पीएलसी३८४२२१
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. सी-२१, टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१
कॉर्पोरेट कार्यालय: २७ए, डेव्हलप्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई, तामिळनाडू - ६०००३२
टेली.: (०४४) २२४२७५२५; **वेबसाईट:** https://hindujaleylandfinance.com/;
ईमेल: investorrelations@hindujaleylandfinance.com
नमुना क्र. सीएए.२
[कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३०(३) आणि कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ व ७ च्या अनुषंगाने]
राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांचे समक्ष
कंपनी योजना अर्ज सी.ए. (सी.ए.ए.) /१०७/एमबी/२०२६
कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात
आणि
कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ सह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या प्रकरणात
आणि
हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड आणि एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड)
आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण योजनेच्या प्रकरणात
हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींतर्गत स्थापित कंपनी आणि)
कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत अस्तित्वात असलेली कंपनी, नोंदणीकृत कार्यालय, प्लॉट क्र. सी-२१,)
टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५१.)
CIN: यू६५९९३एमएच२००८पीएलसी३८४२२१) .....पहिली अर्जदार कंपनी / हस्तांतरकर्ता कंपनी
हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड च्या असुरक्षित धनकोंची सभा घेण्यात येणार असल्याची सूचना व सूचनेची जाहिरात
याद्वारे **सूचित** करण्यात येते की माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (**''माननीय न्यायाधिकरण''**) यांनी कंपनी योजना अर्ज क्र. सी.ए. (सीएए)/१०७/एमबी/२०२६ मध्ये पारित केलेल्या दि. १७ जून, २०२६ च्या आदेशान्वये (**''आदेश''**) त्यांनी इतर बाबींशिवाय असे निर्देश दिले की **हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड** (**''हस्तांतरकर्ता कंपनी'' किंवा ''कंपनी''**) च्या सुरक्षित धनकोंची सभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग किंवा इतर दृक्श्राव्य पद्धतींनी (**''व्हीसी/ओएव्हीएम''**), (**''सभा''**) घेण्यात यावी ज्यात हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड च्या एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण करण्याची प्रस्तावित योजना (**''योजना''**) विचारात घेण्यात यावी, आणि योग्य वाटत असल्यास, बदलांसह किंवा बदलांशिवाय मंजूर करण्यात यावी.
माननीय एनसीएलटी यांचा सदर आदेश आणि त्यातील निर्देशांच्या अनुषंगाने कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ आणि त्याअंतर्गत इतर लागू नियमांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ (**''अधिनियम''**) मधील तरतुदींचे, आणि व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून आमसभा घेण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने जारी केलेल्या लागू सामान्य परिपत्रकांचे पालन करीत असुरक्षित धनकोंची आमसभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता घेण्यात येणार आहे आणि इंस्टीट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मीटींग्ज (''SS-2'') आणि सदर नियमांसह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील लागू तरतुदींचे पालन करीत असुरक्षित धनकोंना ई-मतदान सुविधा देण्यात येणार आहे. ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून राबविण्यात येणार असल्याने समभागधारकांनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही.
कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि दि. ०४ जुलै, २०२६ रोजीच्या सदर सूचनेची संबंधित जोडपत्रे यांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १०२ आणि सदर अधिनियमातील इतर लागू तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद २३०(३) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार दि. २६ जून, २०२६ रोजी च्या सभासदांचे ई-मेल अ‍ॅड्रेस कंपनी/डिपॉझिटरी, डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स (DPs) / कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्स्फर एजंट - केफिन टेक्नोलॉजीज लिमिटेड / एमयुएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (**''आरटीए''**) यांचेकडे आधीच नोंदविलेले आहेत त्यांना वर नमूद दि. ०४ जुलै, २०२६ रोजीची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे.
हस्तांतरकर्ता कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (**''एनएसडीएल''**) च्या www.evoting.nsdl.com येथे योजनेसह खुलासापत्र विवरण आणि संबंधित जोडपत्रांसह सदर सूचनेची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
कुणाही असुरक्षित धनकोस सूचना, खुलासापत्र विवरण आणि इतर दस्तावेजांची छापील प्रत हवी असल्यास त्यासाठी ते हस्तांतरकर्ता कंपनीकडे २७ ए, डेव्हलप्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - ६०००३२, तामिळनाडू येथे विनंती पाठवू शकतात आणि हस्तांतरकर्ता कंपनी त्या असुरक्षित धनकोच्या नोंदणीकृत पत्त्यावर ते पाठवेल. त्याशिवाय, असुरक्षित धनको वर नमूद दस्तावेज सभा सुरु होण्यापूर्वी ४८ तासांपर्यंत हस्तांतरकर्ता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून वर्ष कामकाजाच्या दिवशी (शनिवार व रविवार सोडून) स. ११ (भाप्रवे) ते दु. १.०० वाजेपर्यंत (भाप्रवे) निःशुल्क प्राप्त करू शकतात.
www.hindujaleylandfinance.com या कंपनीच्या वेबसाईटवर गुंतवणूकदार विभागांतर्गत सूचनेत नमूद केल्यानुसार दस्तावेजांची इलेक्ट्रॉनिक प्रत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.
ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून घेण्यात येत असल्याने असुरक्षित धनकोंनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार, सदर सभेसाठी हस्तांतरकर्ता कंपनीच्या असुरक्षित धनकोंनी प्रतिनिधी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध नाही. एनसीएलटी द्वारे भरविण्यात येणारया या सभेचे अध्यक्ष म्हणून माननीय न्यायाधिकरण यांचेद्वारे यांची देवी प्रसाद सेमवाल, आयआरएस (निवृत) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
सदर अधिनियमातील अनुच्छेद २३०(६) नुसार कंपनीच्या आवश्यक बहुसंख्य असुरक्षित धनकोंनी ही योजना मंजूर केल्यास ती माननीय न्यायाधिकरण आणि आवश्यक वाटेल त्यानुसार इतर कोणत्याही निवामक किंवा वैधानिक प्राधिकरणे यांचेकडून इतर मंजुरया, परवानग्या आणि संमतीच्या अधीन असेल.
ई-मतदान:
एनसीएलटी यांच्या आदेशामधील तरतुदी आणि सुधारित कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १०८ आणि इतर लागू तरतुदी, SS-2, आणि ई-मतदानाच्या माध्यमातून आमसभा भरविण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने विहित केलेल्या आवश्यकतांच्या अनुषंगाने कंपनीद्वारे आपल्या असुरक्षित धनकोंना सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदान आणि सभा सुरु असताना एनएसडीएल द्वारे उपलब्ध करून देण्यात येणारी ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेस उपस्थित होण्याची आणि ई-मतदानाची तपशीलवार प्रक्रिया सभेच्या सूचनेचा भाग आहे. दूरस्थ ई-मतदानाशी संबंधित महत्त्वाचे तपशील खाली देण्यात आलेले आहेत:

ई-मतदानासाठी कट-ऑफ दिनांक	२३ जुलै, २०२६ (गुरुवार)
दूरस्थ ई-मतदान कालावधी सुरु होणे	२७ जुलै, २०२६ (सोमवार) रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे)
दूरस्थ ई-मतदान कालावधी समाप्ती	२९ जुलै, २०२६ (बुधवार) रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे)

त्यानंतर एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल. कंपनीद्वारे सभेमध्येसुद्धा ई-मतदानाची सुविधा देण्यात येत आहे. असुरक्षित धनकोंचे मतदान हक्क कट-ऑफ दिनांकास म्हणजे २३ जुलै, २०२६ रोजी त्यांच्या थकबाकीच्या मूल्याच्या गुणोत्तराच्या प्रमाणात असतील. कट-ऑफ दिनांकास ज्या व्यक्तीचे नाव कंपनी / आरटीए कडे असुरक्षित धनको म्हणून नोंदविलेले असेल त्यांनाच मतदान करता येईल.
असुरक्षित धनकोना सभा सुरु असताना ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी (सभेच्या अगोदर) दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून ठरावावर मतदान केलेले नसेल त्यांना सभेत त्या ठरावावर मतदान करता येईल. सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून ठरावावर मतदान करणारया असुरक्षित धनकोंना व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होता येईल, परंतु त्या ठरावावर पुन्हा मतदान करता येणार नाही. सभेच्या दिवशी सभा संपल्यानंतर १५ मिनिटांनी एनएसडीएल द्वारे ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल.
कट-ऑफ दिनांकानंतर कंपनीचे असुरक्षित धनको होणाया एखाद्या व्यक्तीस सभेचे कामकाज पाहाण्याचे असल्यास ते त्यासाठी एनएसडीएल यांचेकडे evoting@nsdl.com येथे किंवा कंपनी/आरटीए कडे विनंती करून लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतात. परंतु, अशा व्यक्तीस ठरावावर मतदान करता येणार नाही.
ज्या असुरक्षित धनकोंनी आपले ई-मेल अ‍ॅड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांनी विनंती आहे की ते डीमॅट स्वरुपात समभाग धारण करीत असल्यास त्यांनी ते डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडे नोंदवावेत. ज्या असुरक्षित एनसीडी धारकांचे ईमेल अ‍ॅड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर सभेची सूचना देणारी छापील पत्रे पाठविण्यात येत आहेत.
माननीय न्यायाधिकरण यांनी दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया तसेच सभा सुरु असताना ई-मतदान योग्य व पारदर्शक पद्धतीने पार पडावे यासाठी पर्निरीक्षण करण्यासाठी हस्तांतरकर्ता कंपनीचे पर्निरीक्षक म्हणून आणि सभा समाप्त झाल्यापासून ३ (तीन) दिवसांचे आत झालेल्या मतदानाबाबत सभेच्या अध्यक्षांकडे किंवा अध्यक्षांनी अधिकृत केलेल्या कुणाही व्यक्तीकडे अहवाल सादर करण्यासाठी प्रणव डी. वैद्य & कं., कंपनी सचिव, व्यवसाय परवाना क्र. ४४३३९ यांची नियुक्ती केलेली आहे.
त्यानुसार, असुरक्षित धनकोंना विनंती आहे की त्यांनी वर नमूद पद्धतीने, दिनांकास व वेळी सभेस उपस्थित व्हावे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होणाया असुरक्षित धनकोंची उपस्थिती सदर अधिनियमातील अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमसाठी ग्राह्य धरण्यात येईल. सभा सुरु होताना सभेसाठी सदर उल्लेखित कोरम उपस्थित नसल्यास सभा ३० मिनिटांसाठी बरखास्त करण्यात येईल, त्यानंतर, उपस्थित असुरक्षित धनको हेच कोरम आहे असे समजण्यात येईल.
०१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत मतदानाचे निकाल कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि एनएसडीएल च्या वेबसाईटवर www.evoting.nsdl.com येथे प्रदर्शित करण्यात येतील, शिवाय बीएसई लिमिटेड यांचेकडेसुद्धा पाठविण्यात येतील.
काही प्रश्न / तक्रारी असल्यास, असुरक्षित धनको धनकोंसाठी सहसा विचारण्यात येणारे प्रश्न (''FAQs'') पाहू शकतात किंवा ८०० २२२ ९९० वर कॉल करू शकतात किंवा www.evoting.nsdl.com येथे विनंती पाठवू शकतात किंवा एनएसडीएल च्या पत्रावी म्हाने यांचेशी evoting@nsdl.com येथे संपर्क साधू शकतात.
स्वा/-
स्थान: ग्रेटर नोएडा **देवी प्रसाद सेमवाल**
दिनांक: ०४ जुलै, २०२६ **सभेसाठी नियुक्त अध्यक्ष**

यूनियन बैंक ऑफ इंडिया **Union Bank** of India
प्रादेशिक कार्यालय : दुकान क्र. 201 आणि 202, स्टेलर एन्क्लेव, औंध, पुणे - 411 007.
ई-लिलाव विक्री सूचना (सर्फेसी अधिनियमांतर्गत)
सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002 मधील नियम 8(6) मधील तरतुदीसह वाचण्यात येणाया सिक्युरिटायझेशन अँड फायनॅन्शियल ॲसेट्स एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी 15 दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनको कडे तारण / गहाणत असलेल्या खालील वर्णाच्या अचल मालमत्तेचा युनियन बँक ऑफ इंडिया (सुरक्षित धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून त्यांची खाली नमूद करण्यात आलेल्या संबंधित कर्जदार व जामीनदारांबद्दल व युनियन बँक ऑफ इंडिया (सुरक्षित धनको) यांना घेणे असलेल्या संबंधित रकमांच्या वसुलीसाठी 28.07.2026 रोजी दु. 12.00 वे सायं. 05.00 वाजेपर्यंत "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे", "तेथे जे काही आहे" आणि "इतर उपाय नाही" तत्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किमत आणि बयाणा रक्कम खाली देण्यात आलेली आहे. विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया युनियन बँक ऑफ इंडिया (सुरक्षित धनको) च्या वेबसाईटवर म्हणजे www.unionbankofindia.co.in वर दिलेली लिंक पहावी. खाली नमूद मालमत्तांची संबंधित कर्जदारांच्या खात्यांमधील संबंधित रकमा अधिक व्याज आणि इतर खर्चांच्या वसुलीसाठी दि. 28.07.2026 रोजी https://baanknet.com या वेबसाईटच्या माध्यमातून ऑनलाइन ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल.
https://baanknet.com या वेबसाईटच्या माध्यमातून ऑनलाईन ई-लिलाव
**लिलावाचा दिनांक व वेळ : 28.07.2026

भंडारी स्ट्रीट रेल्वे पादचारी पूल बंद

प्रवाशांसाठी पर्यायी मार्गांची व्यवस्था

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मध्य रेल्वेवरील मशीद रेल्वे स्थानकादरम्यानचा भंडारी स्ट्रीट आणि संत तुकाराम मार्ग यांना जोडणारा भंडारी पालिका सार्वजनिक रेल्वे पादचारी पूल धोकादायक झाल्याने तातडीने प्रवाशांसाठी बंद करण्यात आला. नवीन पादचारी पुलाच्या उभारणीसाठी हा निर्णय घेण्यात आला असून, मध्य रेल्वे आणि मुंबई महापालिकेने प्रवाशांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

मध्य रेल्वेच्या वरिष्ठ विभाग अभियंता (पूल/ओएचएस) कार्यालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, सीएसएमटी - मशीद स्थानकांदरम्यान किलोमीटर ०.८८० वरील भंडारी पालिका सार्वजनिक पादचारी पूल (सीएसएमटी बाजू) शनिवारपासून बंद करण्यात आला. या पुलाच्या जागी लवकरच नवीन पादचारी पुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. पूल बंद असताना पूर्व-पश्चिम दिशेने ये-जा करणाऱ्या नागरिकांनी आणि रेल्वे प्रवाशांनी मशीद रेल्वे स्थानकाच्या दुसऱ्या बाजूचा पालिका सार्वजनिक पादचारी पूल, सिंदूर पूल किंवा युसूफ मेहरअली रोड या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि सुरक्षित हालचाल सुनिश्चित करण्यासाठी संबंधित स्थानकांवर सार्वजनिक सूचना देण्यात येणार आहेत. तसेच रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) आणि रेल्वे पोलीसांचे कर्मचारी मार्गदर्शनासाठी तैनात करण्यात येणार असून, मशीद स्थानकावर नियमित ध्वनिक्षेपकाद्वारे सूचना दिल्या जाणार आहेत. रेल्वे प्रशासनाने नागरिकांना बंद करण्यात आलेल्या पुलावरून जाण्याचा प्रयत्न न करता केवळ अधिकृत पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

पदवी प्रवेश न मिळण्याच्या तणावाने विद्यार्थिनीची आत्महत्या

कल्याण : कल्याणमधील बी. के. बिर्ला महाविद्यालयातून १२ वी उत्तीर्ण झालेल्या एका विद्यार्थिनीने १८ जून रोजी विषारी द्रव्य पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. मुंबईतील जे. जे. रुग्णालयात उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. अक्षदा भिमसिंग वळवी (१८) असे या विद्यार्थिनीचे नाव असून 'बॅचलर ऑफ कॉस्ट अकाऊंट' या अभ्यासक्रमाला प्रवेशासाठीचे मुंबई विद्यापीठाचे पोर्टल बंद झाल्याने आपले वर्ष आता फुकट जाणार, या तणावातून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

कल्याण पश्चिमेकडील सत्यद्रीनगर भागातील एका गृहसंकुलात अक्षदा कुटुंबीयांसमवेत राहत होती. मुंबई विद्यापीठाच्या 'बॅचलर ऑफ कॉस्ट अकाऊंट' अभ्यासक्रमाची सीईटी ती चांगल्या गुणाने उत्तीर्ण झाली होती. मात्र प्रवेश न मिळण्याच्या तणावातून तिने विषारी द्रव्य प्राशन केले. त्यानंतर १० दिवसांनी तिचा मृत्यू झाला. हा गुन्हा खडकपाडा पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

विद्यार्थी शाळेत; शिक्षक 'एसआयआर'चा वर्गात

या प्रश्नांचे काय?

(पान १ वरून) याचे गणित आता शिक्षक घालत असून, त्यातून उरणाऱ्या वेळात शिकविणार कधी, असाही प्रश्न काहींनी उपस्थित केला. सध्या दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी या इयत्तांना राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार तयार केलेल्या नव्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके लागू करण्यात आली आहेत. नवा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी शिक्षकांना तयारी करणे गरजेचे असताना, नेमक्या त्याचवेळी २९ जून ते ३१ जुलै या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'एसआयआर' मोहिमेत शिक्षकांना 'बीएलओ' म्हणून काम करावे लागणार आहे.

आधी पूर्ण वेळ काम करण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले. शिक्षक संघटनांकडून आक्षेप घेण्यात आल्यावर मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने २७ जून रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ देऊन शिक्षकांना सुटीच्या दिवशी, तसेच शैक्षणिक कामाच्या वेळेनंतर 'बीएलओ'चे काम देण्याच्या सूचना आल्या. त्यानंतर ३ जुलैला मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना नवे पत्र दिले. त्यात 'बीएलओ' असलेल्या शिक्षकांना कमी तासिका द्याव्यात आणि ते काम नसलेल्या शिक्षकांना 'बीएलओ' कामात साहाय्य करण्याबाबत सूचित करावे, असे नमूद आहे. शाळेची वेळ वगळता अन्य वेळेत, सुटीच्या दिवशी शिक्षकांना 'एसआयआर'चे काम करायला लावणे म्हणजे वेठबिगार समजण्यासारखे आहे. शिक्षकांना शारीरिक, मानसिक स्वास्थ्य, कौटुंबिक जबाबदाऱ्या नसतात का? याचा विपरीत परिणाम होऊन संतापाचा उद्रेक होण्याची शिथती आहे,' असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले. ॲक्टिव्ह टीचर्स फोरमचे संयोजक भाऊ चासकर म्हणाले, 'जनगणनेच्या पहिल्या टप्प्यानंतर शाळा सुरू झाल्यावर २९ दिवस सेतू अभ्यासक्रम राबवण्याचे नियोजन दिले होते. मात्र, 'एसआयआर'चे काम आल्याने अध्यापन विस्कळीत झाले.'

- नीती आयोगाच्या अहवालाबुसार, राज्यात ८ हजारांहून अधिक एकशिक्षकी शाळा आहेत. त्यात सुमारे दीड लाखांहून अधिक विद्यार्थी शिकतात. या शिक्षकांनाही 'बीएलओ'चे काम आहे. अशा वेळी या विद्यार्थ्यांचे शिक्षण कसे होणार ?
- वर्षभरात प्राथमिक वर्गांसाठी किमान २०० दिवस, तर माध्यमिक वर्गांसाठी किमान २२० दिवस अध्यापन होणे बंधनकारक आहे. शिक्षकांच्या 'बीएलओ'च्या कामामुळे अध्यापन होत नसल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षण हक्काचे काय ?

'शिक्षण प्राधान्यक्रम नाही का?'

'विद्यार्थी वर्गात, शिक्षक बाहेर, शिक्षण वाऱ्यावर अशी सध्या स्थिती असून, मुलांचे शिक्षण हा आपल्या समाजाचा प्राधान्यक्रम नाही, याचे वैषम्य वाटते. शालेय वेळेव्यतिरिक्त ही कामे करण्याचा सल्ला देणे व्यवहार्य नाही. शिक्षण हक्क कायद्यातील कलम २७ नुसार, शिक्षकांना केवळ जनगणना, प्रत्यक्ष निवडणूक आणि नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाची कामे देण्याची तरतूद आहे. शिक्षकांना अशेक्षणिक कामांतून मुक्त करणे आवश्यक आहे,' असे भाऊ चासकर यांनी नमूद केले.

महामुंबईच्या गटांगळ्या

(पान १ वरून) इतर कचरा मॅनहोल किंवा नाल्यांमध्ये अडकून पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी टिकठिकाणी कर्मचारी सातत्याने सेवा बजावत होते. पावसाचे पाणी उपसण्यासाठी मुंबईत ५४७ पंप बसवण्यात आले असून शनिवारी ४४८ उदंचन संच कार्यान्वित करण्यात आले होते. हे उदंचन संच चालवण्यासाठी प्रशिक्षित पंपचालक प्रत्यक्ष ठिकाणी तैनात करण्यात आले होते. त्याचबरोबर १९ ठोके उदंचन केंद्रे कार्यान्वित करण्यात आले होते.

हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिल्यानंतर मुंबईतील सर्व शाळांना शनिवारी दुपारच्या सत्रात सुट्टी जाहीर करण्यात आली.

रविवारीही अतिवृष्टीचा इशारा

हवामान विभागाने रविवारीही अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला असून आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन मुंबई महापालिका प्रशासनाने केले आहे. नागरिकांनाही आवश्यकता नसल्यास पावसादरम्यान घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन पालिकेने केले आहे. तसेच रविवारी दुपारी ३.२२ वाजता समुद्राला भरती येणार असून या वेळी ४.१९ मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता.

गोवंडीत घर पडले.

गोवंडीतील बैगनवाडी येथे जी लाइन रोड नं १० येथे दुपारी दीड वाजता एकमजली घर पडले. या दुर्घटनेत एक महिला व एक पुरुष जखमी झाले. त्यांना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

HINDUJA LEYLAND FINANCE

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड

कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): यू६५९९३१एमएच२००८पीएलसी३८४२२१

नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. सी-२१, टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१

कॉर्पोरेट कार्यालय: 27ए, डेव्हलप्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई, तामिळनाडू - ६०००३२

टेली.: (०४४) २२४२७५२५; **चेबसाईट:** https://hindujaleylandfinance.com/;

ईमेल: investorrelations@hindujaleylandfinance.com

नमुना क्र. सीएए.२

[कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३०(३) आणि कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ व ७ च्या अनुषंगाने]

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांचे समक्ष कंपनी योजना अर्ज सी.ए. (सी.ए.ए.) /१०७/एमबी/२०२६

कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात

आणि

कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ सह वाचण्यात योणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या प्रकरणात

आणि

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड आणि एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड)

आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण योजनेच्या प्रकरणात

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींतर्गत स्थापित कंपनी आणि)
कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत अस्तित्वात असलेली कंपनी, नोंदणीकृत कार्यालय, प्लॉट क्र. सी-२१,)
टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५१.)
CIN: यू६५९९३१एमएच२००८पीएलसी३८४२२१) .....पहिली अर्जदार कंपनी / हस्तांतरकर्ता कंपनी

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड च्या असुरक्षित धनकोंची सभा घेण्यात येणार असल्याची सूचना व सूचनेची जाहिरात

याद्वारे **सूचित** करण्यात येते की माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (**''माननीय न्यायाधिकरण''**) यांनी कंपनी योजना अर्ज क्र. सी.ए. (सीएए)/१०७/एमबी/२०२६ मध्ये पारित केलेल्या दि. १७ जून, २०२६ च्या आदेशानुसार (**''आदेश''**) त्यांनी इतर बाबींशिवाय असे निर्देश दिले की **हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड** (**''हस्तांतरकर्ता कंपनी''** किंवा **''कंपनी''**) च्या सुरक्षित धनकोंची सभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग किंवा इतर इक्काव्या पद्धतीनी (**''व्हीसी/ओएव्हीएम''**), (**''सभा''** घेण्यात यावी ज्यात हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड चे एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण कराव्याची प्रस्तावित योजना (**''योजना''**) विचारात घेण्यात यावी, आणि योग्य वाटत असल्यास, बदलांसह किंवा बदलांशिवाय मंजूर करण्यात यावी.

माननीय एनसीएलटी यांचा सदर आदेश आणि त्यातील निर्देशांच्या अनुषंगाने कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ आणि त्याअंतर्गत इतर लागू नियमांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ (**''अधिनियम''**) मधील तरतुदींचे, आणि व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून आमसभा घेण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने जारी केलेल्या लागू सामान्य परिपत्रकांचे पालन करीत असुरक्षित धनकोंची आमसभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता घेण्यात येणार आहे आणि इंस्टीट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मीटींग (''SS-2'') च्या सदर नियमांसह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील लागू तरतुदींचे पालन करीत असुरक्षित धनकोंना ई-मतदान सुविधा देण्यात येणार आहे. ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून यवचिण्यात येणार असल्याने समभागधारकांनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही.

कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि दि. ०४ जुलै, २०२६ रोजीच्या सदर सूचनेची संबंधित जोडपत्रे यांसह याद्वारे यवचिण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १०२ आणि सदर अधिनियमातील इतर लागू तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद २३०(३) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार दि. २६ जून, २०२६ रोजी च्या सभासदांचे ई-मेल अ‍ॅड्रेस कंपनी/डिपॉझिटरीज, डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स (DPs) / कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्स्फर एजंट - केफिन टेक्नोलॉजीज लिमिटेड / एमयुएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (**''आरटीए''**) यांचेकडे आधीच नोंदविलेले आहेत त्यांना वर नमूद दि. ०४ जुलै, २०२६ रोजीची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे.

हस्तांतरकर्ता कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (**''एनएसडीएल''**) च्या www.evoting.nsdl.com येथे योजनेसह खुलासापर विवरण आणि संबंधित जोडपत्रांसह सदर सूचनेची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

कुणाही असुरक्षित धनकोस सूचना, खुलासापर विवरण आणि इतर दस्तावेजांची छापील प्रत हवी असल्यास त्यासाठी ते हस्तांतरकर्ता कंपनीकडे २७ ए, डेव्हलप्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - ६०००३२, तामिळनाडू येथे विनंती पाठवू शकतात आणि हस्तांतरकर्ता कंपनी त्या असुरक्षित धनकोच्या नोंदणीकृत पत्त्यावर ते पाठवेल. त्याशिवाय, असुरक्षित धनको वर नमूद करावेत्र सभा सुरू होण्यापूर्वी 48 तासांपर्यंत हस्तांतरकर्ता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून वर्ष कामकाजाच्या दिवशी (शनिवार व रविवार सोडून) स. ११ (भाप्रवे) ते दु. १.०० वाजेपर्यंत (भाप्रवे) निःशुल्क प्राप्त करू शकतात.

www.hindujaleylandfinance.com या कंपनीच्या वेबसाईटवर गुंतवणूकदार विभागांतर्गत सूचनेत नमूद केल्यानुसार दस्तावेजांची इलेक्ट्रॉनिक प्रत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून घेण्यात येत असल्याने असुरक्षित धनकोंनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार, सदर सभेसाठी हस्तांतरकर्ता कंपनीच्या असुरक्षित धनकोंनी प्रतिनिधी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध नाही. एनसीएलटी द्वारे भरविण्यात येणाऱ्या या सभेचे अध्यक्ष म्हणून माननीय न्यायाधिकरण यांचेद्वारे श्री देवी प्रसाद सेमवाल, आयआरएस (निवृत्त) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर अधिनियमातील अनुच्छेद २३०(६) नुसार कंपनीच्या आवश्यक बहुसंख्य असुरक्षित धनकोंनी ही योजना मंजूर केल्यास ती माननीय न्यायाधिकरण आणि आवश्यक वाटेल त्यानुसार इतर कोणत्याही नियामक किंवा वैधानिक प्राधिकरणे यांचेकडून इतर मंजुरया, परवानग्या आणि संमतीच्या अधीन असेल.

ई-मतदान:

एनसीएलटी यांच्या आदेशामधील तरतुदी आणि सुधारित कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १०८ आणि इतर लागू तरतुदी, SS-2, आणि ई-मतदानाच्या माध्यमातून आमसभा भरविण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने विहित केलेल्या आवश्यकतांच्या अनुषंगाने कंपनीद्वारे आपल्या असुरक्षित धनकोंना सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदान आणि सभा सुरु असताना एनएसडीएल द्वारे उपलब्ध करून देण्यात येणारी ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेस उपस्थित होण्याची आणि ई-मतदानाची तपशीलवार प्रक्रिया सभेच्या सूचनेचा भाग आहे.

दूरस्थ ई-मतदानाशी संबंधित महत्त्वाचे तपशील खाली दिलेल्या आलेले आहेत:

ई-मतदानासाठी कट-ऑफ दिनांक	२३ जुलै, २०२६ (गुरुवार)
दूरस्थ ई-मतदान कालावधी सुरु होणे	२७ जुलै, २०२६ (सोमवार) रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे)
दूरस्थ ई-मतदान कालावधी समाप्ती	२९ जुलै, २०२६ (बुधवार) रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे)

त्यानंतर एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल. कंपनीद्वारे सभेमध्येसुद्धा ई-मतदानाची सुविधा देण्यात येत आहे. असुरक्षित धनकोंचे मतदान हक्क कट-ऑफ दिनांकास म्हणजे २३ जुलै, २०२६ रोजी त्यांच्या थकबाकीच्या मूल्याच्या गुणोत्तराच्या प्रमाणात असतील. कट-ऑफ दिनांकास ज्या व्यक्तीचे नाव कंपनी / आरटीए कडे असुरक्षित धनको म्हणून नोंदविलेले असेल त्यांनाच मतदान करता येईल.

असुरक्षित धनकोंना सभा सुरु असताना ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी (सभेच्या अगोदर) दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून त्यावर मतदान केलेले नसेल त्यांना सभेत त्या ठरावावर मतदान करता येईल. सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून ठरावावर मतदान करणारया असुरक्षित धनकोंना व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होता येईल, परंतु त्या ठरावावर पुन्हा मतदान करता येणार नाही. सभेच्या दिवशी सभा संपल्यानंतर १५ मिनिटांनी एनएसडीएल द्वारे ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल.

कट-ऑफ दिनांकानंतर कंपनीचे असुरक्षित धनको होणारया एखाद्या व्यक्तीस सभेचे कामकाज पाहायचे असल्यास ते त्यासाठी एनएसडीएल यांचेकडे evoting@nsdl.com येथे किंवा कंपनी/आरटीए कडे विनंती करून लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतात. परंतु, अशा व्यक्तीस ठरावावर मतदान करता येणार नाही.

ज्या असुरक्षित धनकोंनी आपले ई-मेल अ‍ॅड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना विनंती आहे की ते डीमॅट स्वरूपात समभाग धारण करीत असल्यास त्यांनी ते डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडे नोंदविले आहे. त्या असुरक्षित एनसीडी धारकांचे ईमेल अ‍ॅड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर सभेची सूचना देणे पाठविण्यात येत आहेत.

माननीय न्यायाधिकरण यांनी दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया तसेच सभा सुरु असताना ई-मतदान योग्य व पारदर्शक पद्धतीने पार पडावे यासाठी परिनिरीक्षण करण्यासाठी हस्तांतरकर्ता कंपनीचे परिनिरीक्षक म्हणून आणि सभा समाप्त झाल्यापासून ३ (तीन) दिवसांचे आत झालेल्या मतदानावर विचारून अध्यक्षांनी अधिकृत केलेल्या कुणाही व्यक्तीकडे अहवाल सादर करण्यासाठी प्रणय डी. वैद्य & कं., कंपनी सचिव, व्यवसाय परवाना क्र. २४३३९ यांची नियुक्ती केलेली आहे.

त्यानुसार, असुरक्षित धनकोंना विनंती आहे की त्यांनी वर नमूद पद्धतीने, दिनांकास व वेळी सभेस उपस्थित त्यावे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होणारया असुरक्षित धनकोंची उपस्थिती सदर अधिनियमातील अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमसाठी ग्राह्य धरण्यात येईल. सभा सुरु होताना सभेसाठी सदर उल्लेखित कोरम उपस्थित नसल्यास सभा ३० मिनिटांसाठी बरखास्त करण्यात येईल, त्यानंतर, उपस्थित असुरक्षित धनको हेच कोरम आहे असे समजण्यात येईल.

०१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत मतदानाचे निकाल कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि एनएसडीएल च्या वेबसाईटवर www.evoting.nsdl.com येथे प्रदर्शित करण्यात येतील, शिवाय बीएसई लिमिटेड यांचेकडेसुद्धा पाठविण्यात येतील.

काही प्रश्न / तक्रारी असल्यास, असुरक्षित धनको धनकोंसाठी सहसा विचारण्यात येणारे प्रश्न (''FAQs'') पाहू शकतात किंवा १८०० २२२ ९९० वर कॉल करू शकतात किंवा www.evoting.nsdl.com येथे विनंती पाठवू शकतात किंवा एनएसडीएल च्या पत्तावी म्हात्रे यांचेशी evoting@nsdl.com येथे संपर्क साधू शकतात.

स्थान: ग्रेटर नोएडा
दिनांक: ०४ जुलै, २०२६

स्वा/-
देवी प्रसाद सेमवाल
सभेसाठी नियुक्त अध्यक्ष

प्रसादित्य एअरस्पेस लिमिटेड

आधी ग्रिव्ही अ‍ॅसेट फिनान्ट्रक्चर अँण्ड सिक्युरिटायझेशन कंपनी लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे

नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय: डी.नं.१-५५, राजा प्रसादमू, ४था मजला, विग-१, मसिद बांदा रोड, कोठापूर, हैदाराबाद - ८४, टेलि.: ०४७- ४१४३३३३
सीआयएन: यू६७१२०टीजी२०००पीएलसी०५३३२०, ईमेल: co@paras.gor.in, वेब: www.paras.org.in

मे. मिड सिटी प्रोजेक्ट्स एलएलपी
यांच्या खात्यात ठेवलेल्या तारण मालमत्तेची विक्री

स्थावर मालमत्तेच्या ताब्रिताची विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या (नियम ८(६) च्या तरतुदीच्या संदर्भ च्या).

सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२ अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) चे तसुद सहायता स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार व जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता मे. प्रसादित्य एअरस्पेस लिमिटेड (पीएआरसी) (आधी ग्रिव्ही अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन अँण्ड सिक्युरिटायझेशन कंपनी लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे), (''सुरक्षित धनको'') यांचकडे सहाय आहे, सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी त्यांचा ऱ्यताबाब ताबा घेतला आहे, त्याची विक्री, जिम्मेवारीवर आणि यांचाही यरुकेची कायद्याच्या तरतुदीनुसार, ''जशी आहे तशी आहे'', ''जे आहे ते'' आणि ''तिथे जे काही आहे ते'' या तत्त्वावर, खाली नमूद केलेल्या तारखेला, वेळेला आणि ठिकाणी ऑनलाइन जाहीर लिलावद्वारे केली जाईल. सदर ही विक्री, सुरक्षित धनकोचे रु. ६,१३,५६,४०२/- (रुपये सहा कोटी त्यानण्वव लाख चौपन्न हजार चारशे दोन फक्त) दि. १०.०६.२०२६ रोजीनुसार मे. मिड सिटी प्रोजेक्ट्स एलएलपी (त्यांच्या भागीदारीमर्फत) यांच्या कर्जा खाते क्रमांक: एएच००२४०१७५ यावर पुढील व्याज आणि त्यावरील खर्चाच्या इतर सर्व बाबींची वसूल करण्याबाबतची केली जाईल. कर्ज खाते क्र.: एएच००२४०१७५, त्यात्या मूळ तारणाच्या, स्थावर मालमत्तेसंबंधित, सध्याच कब्जित ठिकाणे (आधी इंडिकुब्ज हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जाणारे) यांचाद्वारे दिनांकित ३१.१२.२०२५ रोजीच्या हस्तांतरण करारानाद्वारे सुरक्षित धनकोला हस्तांतरित करण्यात आले होते.

स्थावर तारण मालमत्तेचे वर्णन

बाब क्र. १

फ्लॅट क्र.: ११०१

खालीलसमेत मालमत्ता/युनिट/अपार्टमेंट/फ्लॅट (बांधलेले/बांधले जाणारे) त्यावरील सर्व वर्तमान आणि/किंवा भविष्यातील एफएसआय आणि सर्व वर्तमानच्या एकत्रित आणि/किंवा भविष्यातील संरचना, फर्निचर, फिक्सचर्स, फिटिंग्ज, स्थायी आणि/किंवा स्थापित/स्थापित केली जाणारी प्लांट आणि उपकरणे आणि/किंवा त्यावर बांधलेले/बांधले जाणारे आणि त्यामधील संबंधित मालकाचे सर्व वर्तमान आणि भविष्यातील हक्क, मालकी आणि/किंवा त्यामधील संबंधित मालकाचे हितसंबंधसह यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल:

अ. क्र.	विंग/टॉवर	युनिट/फ्लॅट	मजला	कार्पेट क्षेत्रफळ (चौरस फूट)	मालक
१.	व्हाइटस्टोन	११०१	११	१८००	श्री. जागृत ध्रुव
	एकूण			१८००	

एकूण १ युनिट/अपार्टमेंट/फ्लॅट आणि एकूण १८०० चौरस फूट (कार्पेट एरिया) यांत युनिट/अपार्टमेंट/फ्लॅटसाठी वाटपे केलेल्या/करण्यात येणाऱ्या २ कार पार्किंग जागांसह (तळमजल्यावर) एकत्रित, रुपया ''व्हाइटस्टोन'' (पूर्वीचे नाव स्वरोस्की) नावाच्या प्रसारीत/प्रकल्पात आणि सध्या नंदोदय को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड नावाने ओळखली जाणारी सोसायटी, नवा निवेश योजना क्र. ३ च्या प्लॉट क्र. ६८४ यावर बांधलेले/बांधण्यात येणारे ६८४ आणि नवीन सीटीएस क्रमांक ई/१४४, मोजमापे वेक्षणक ७३५.८१४ चौरस मीटर, एकूण १,४५६.९१४ चौरस मीटर वेक्षणक, १६ वा रस्ता, खार (पश्चिम), गाव वांद्रे, मुंबई - ४०००५२, महाराष्ट्र, मुंबई उपनगर नोंदणी जिल्ह्याच्या हद्दीतील (''निर्दिष्ट जमीन'') येथे पसरलेले, खाली आणि स्थित असलेले वरील निर्दिष्ट जमीन, सामायिक क्षेत्रे आणि सामायिक सुविधा/सोयी यांमधील प्रमाणशीर अविभाजित हिस्सा, हक्क, मालकी आणि/किंवा हितसंबंधांसह एकत्रित.

बाब क्र. २

फ्लॅट क्र.: १२०१:

खालीलसमेत मालमत्ता/युनिट/अपार्टमेंट/फ्लॅट (बांधलेले/बांधले जाणारे) त्यावरील सर्व वर्तमान आणि/किंवा भविष्यातील एफएसआय आणि सर्व वर्तमानच्या एकत्रित आणि/किंवा भविष्यातील संरचना, फर्निचर, फिक्सचर्स, फिटिंग्ज, स्थायी आणि/किंवा स्थापित/स्थापित केली जाणारी प्लांट आणि उपकरणे आणि/किंवा त्यावर बांधलेले/बांधले जाणारे आणि त्यामधील संबंधित मालकाचे सर्व वर्तमान आणि भविष्यातील हक्क, मालकी आणि/किंवा त्यामधील संबंधित मालकाचे हितसंबंधसह यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल:

अ. क्र.	विंग/टॉवर	युनिट/फ्लॅट	मजला	कार्पेट क्षेत्रफळ (चौरस फूट)	मालक
१.	व्हाइटस्टोन	१२०१	१२	११३०	श्री. हिरेन ध्रुव
	एकूण			११३०	

एकूण १ युनिट/अपार्टमेंट/फ्लॅट, त्यांचे एकूण क्षेत्रफळ ११३० चौरस फूट (कार्पेट एरिया) आहे, तसेच वरील निर्दिष्ट युनिट/अपार्टमेंट/फ्लॅटसाठी वाटपे केलेल्या/केल्या जाणाऱ्या २ कार पार्किंग जागा (तळमजल्यावर), सध्या ''व्हाइटस्टोन'' (पूर्वीचे स्वारोस्की) नावाच्या प्रसारीत/प्रकल्पात आणि सध्या नंदोदय को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड नावाने ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमधे, नवा निवेश योजना क्र. ३ च्या प्लॉट क्र. ६८४ वर बांधलेले/बांधले जाणारे असून, त्याचा नवीन सीटीएस क्रमांक ई/१४० आहे, मोजमापे वेक्षणक ७१९ चौरस मीटर आणि नवा निवेश योजना क्र. ३ चा प्लॉट क्र. ६८४, त्याचा नवीन सीटीएस क्रमांक ई/१५१ आहे, मोजमापे वेक्षणक ७३५.८१४ चौरस मीटर, एकूण एकत्रित वेक्षणक १,४५६.९१४ चौरस मीटर येथे स्थित १६ वा रस्ता, खार (पश्चिम), गाव वांद्रे, मुंबई - ४०००५२, महाराष्ट्र मुंबई उपनगर नोंदणी जिल्ह्याच्या हद्दीत (''निर्दिष्ट जमीन'') येथे पसरलेले, धारण आणि स्थित असलेले वरील निर्दिष्ट जमीन, सामायिक क्षेत्रे आणि सामायिक सुविधा/सोयी यांमधील प्रमाणशीर अविभाजित हिस्सा, हक्

अमेरिकेच्या सामन्यात प्रेक्षकसंख्येचा विक्रम

न्यूयॉर्क : अमेरिकेने बोलिव्या-हर्जेगोविनाविरुद्ध विजय मिळवत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. या सामन्याने अमेरिकेत इंग्रजी भाषेतील फुटबॉल प्रसारणाच्या इतिहासात सर्वाधिक प्रेक्षकसंख्येचा विक्रम नोंदवला. फॉक्स स्पोर्ट्सनुसार, हा सामना २ कोटी ४४ लाख प्रेक्षकांनी पाहिला. २००२ नंतर अमेरिका संघाचा हा विश्वचषक बाद फेरीतील पहिला विजय ठरला. या सामन्याने २०१५च्या 'फिफा' महिला विश्वचषक अंतिम सामन्याचा २ कोटी २३ लाख प्रेक्षकांचा विक्रम मोडला. अमेरिकेत इंग्रजी व्यतिरिक्त अन्य भाषांतही प्रसारण केले जाते.

१३ ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध इंडोनेशियाच्या मोहम्मद हानी याच्याकडून स्वयंगोल झाला. यंदाच्या विश्वचषकातील हा विक्रमी १३वा स्वयंगोल ठरला. याआधी २०१८ विश्वचषक स्पर्धेत १२ स्वयंगोल झाले होते.

अतिरिक्त वेळेतील स्वयंगोल अर्जेंटिनाच्या पथ्यावर

केप व्हर्डेपुढे जगज्जेत्यांचाही संघर्ष

वृत्तसंस्था, मियामी

स्पेनविरुद्धची ऐतिहासिक बरोबरी, गटातून दमदार आगेकुच आणि बाद फेरीतील संस्मरणीय खेळ अशा स्वप्नवत प्रवासानंतर केप व्हर्डेचे पदार्पणाच्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील आव्हान अखेर संपुष्टात आले. मात्र, 'राउंड ऑफ ३२'च्या लढतीत त्यांनी गतविजेत्या अर्जेंटिनाला दिलेला लढा आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील या छोट्याशा बेटाची फुटबॉल प्रतिभा जगाला दाखविण्यासाठी पुरेसा ठरला. स्पर्धेत सर्वाधिक चर्चेत असलेला केप व्हर्डेचा गोलरक्षक वोझिन्याने लिओनेल मेसीसह अर्जेंटिनाच्या अन्य आक्रमकांचे तब्बल आठ फटके लीलया परतवून लावले. मात्र, अतिरिक्त वेळेत झालेल्या स्वयंगोलमुळे केप व्हर्डेची निराशा झाली आणि अर्जेंटिनाने ३-२ असा निसटता विजय मिळवत उपउपांत्यपूर्व फेरी गाठली.

'फिफा' क्रमवारीत ६४व्या स्थानावर असलेल्या केप व्हर्डेने दोन वेळा पिछाडीवरून पुनरागमन करत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावरील अर्जेंटिनाशी बरोबरी साधली. विश्वचषक इतिहासातील सर्वात मोठ्या धक्क्यांपैकी एक नोंदविण्याच्या उंबरठ्यावर हा संघ पोहोचला होता. मात्र, अखेरीस १११व्या मिनिटाला मेसीने घेतलेल्या कॉर्नर किकवर ख्रिस्तियन रोमेरोच्या हेडरला केप व्हर्डेचा खेळाडू डिनेय बोजेसचा हलकासा स्पर्श झाला आणि चेंडू स्वतःच्याच जाळ्यात गेला. या स्वयंगोलमुळे अर्जेंटिनाला निर्णायक आघाडी मिळाली आणि अखेर त्यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले.

मेसीमुळे आघाडी

सामन्याच्या सुरुवातीपासून अर्जेंटिनाने आक्रमक खेळ केला. २९व्या मिनिटाला लिसांड्रो मार्टिनेझच्या लांब पासवर मेसीने अप्रतिम नियंत्रण मिळवत शानदार फटका मारला आणि चेंडू थेट जाळ्यात धाडला. मेसीचा विश्वचषक कारकीर्दीतील हा २०वा, तर यंदाच्या स्पर्धेतील सातवा गोल ठरला. या गोलनंतर अर्जेंटिनाने वर्चस्व राखले होते. मात्र, पूर्वार्ध संपेपर्यंत त्यांना गोलसंख्येत वाढ करता आली नाही.

डुआर्टेमुळे बरोबरी

उत्तरार्धात केप व्हर्डेने सामन्याचा रंगच बदलून टाकला. डेरॉन डुआर्टेने बॉक्समध्ये अचूक धाव घेत लिसांद्रो मार्टिनेझच्या पायांमधून जोरदार फटका मारत गोल केला. अर्जेंटिनाचा गोलरक्षक एमिलियानो मार्टिनेझला चकवत चेंडू जाळ्यात गेल्यानंतर स्टेडियममधील केप व्हर्डेच्या समर्थकांनी जोरदार जल्लोष केला. अर्जेंटिनाला आघाडीची संधी होती, पण वोझिन्याने त्यांना हताश केले.

अतिरिक्त वेळेत थरार

नियमित ९० मिनिटांनंतर सामना १-१ असा बरोबरीत राहिल्याने अतिरिक्त वेळ खेळवण्यात आली. अतिरिक्त वेळेच्या दुसऱ्याच मिनिटाला ॲलेक्सिस मॅक ॲलिस्टरच्या कॉर्नरवर लिसांद्रो मार्टिनेझने उजव्या कोपऱ्यातून जोरदार किकसह चेंडू गोलजाळ्यात मारला आणि अर्जेंटिनाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. परंतु केप व्हर्डेने हार मानली नाही. १०३व्या मिनिटाला सिडनी लोपेस काब्रालने डाव्या बाजूने आत येत अप्रतिम कर्लिंग शॉट मारला. एमिलियानो मार्टिनेझच्या डोक्यावरून चेंडू थेट गोलच्या वरच्या कोपऱ्यात जाऊन विसावला. या गोलने केप व्हर्डेला बरोबरी करून दिली. मात्र, अतिरिक्त वेळेच्या उत्तरार्धात स्वयंगोलमुळे केप व्हर्डेला पराभव पत्करावा लागला.

मेसीविरुद्ध खेळण्याचे स्वप्न पूर्ण

- लिओनेल मेसीविरुद्ध खेळणे हे माझे स्वप्न आहे, असे विश्वचषक स्पर्धेपूर्वीच्या एका मुलाखतीत केप व्हर्डेचा गोलरक्षक वोझिन्या म्हणाला होता. त्याचे हे स्वप्न पूर्ण झालेच, शिवाय सामन्यानंतर त्याला मेसीकडून कौतुकाची थापही मिळाली.
- "सामना संपल्यानंतर मी मेसीकडे गेलो. त्याने मला मिठी मारली आणि म्हणाला, 'तू अप्रतिम खेळलास. तुझ्या देशातील लोकांना तुझा अभिमान वाटला पाहिजे.' तो क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय होता मेसीसारख्या महान फुटबॉलपटूकडून असे कौतुकाचे शब्द ऐकणे ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. मी त्याचे आभार मानले," असेही वोझिन्या म्हणाला.

मेसीचीच जादू

२०	केप व्हर्डेविरुद्ध मेसीने अर्जेंटिनाचे गोलखाते उघडले. विश्वचषक कारकीर्दीतील २०वा गोल. अशी कामगिरी करणारा पहिला खेळाडू.
८	विश्वचषक स्पर्धेत सलग आठ सामन्यांत गोल करणारा पहिला खेळाडू.
७	दोन विश्वचषक स्पर्धांत सात गोल करणारा पहिला. २०२२ च्या स्पर्धेतही गोलसपाटा.
३०	विश्वचषक स्पर्धेतील ३०वा सामना. सर्वाधिक सामन्यांच्या विक्रमाचा मानकरी. ख्रिस्तियानो रोनाल्डो (२६ सामने) दुसऱ्या स्थानी.

वोझिन्याची भक्कम भिंत : ४० वर्षीय गोलरक्षक वोझिन्या या सामन्यात केप व्हर्डेचा खरा नायक ठरला. त्याने आठ शानदार बचाव (सेव्ह) केले. मेसीसमोरची एकेरी संधी, तसेच त्याच्या फ्री-किकवरही त्याने अप्रतिम झेप घेत गोल वाचवला.

विश्वचषक उपउपांत्यपूर्व फेरी आजचे सामने

- ब्राझील वि. नॉर्वे **वेळ : मध्यरात्री १.३० वा. (सोमवार)**
- इंग्लंड वि. मेक्सिको **वेळ : पहाटे ५.३० वा. (सोमवार)**
- **थेट प्रक्षेपण : 'युनाइटट स्पोर्ट्स', 'झी ५'**

कोलंबियाचे सातत्य कायम; घानावर मात

वृत्तसंस्था, कॅन्सस सिटी

प्रखर उष्णतेत खेळल्या गेलेल्या सामन्यात जॉन अरियासच्या पूर्वार्धातील निर्णायक गोलच्या जोरावर कोलंबियाने घानाचा १-० असा पराभव करत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. साखळीत दोन विजय आणि पोर्तुगालविरुद्ध बरोबरीची नोंद करणाऱ्या कोलंबियाने बाद फेरीतही हेच सातत्य कायम राखत जेतेपदासाठी दावेदारी अधोरेखित केली आहे.

रात्री उशिरापर्यंत ३० अंश सेल्सियसपेक्षा अधिक तापमान असतानाही नेस्टोर लॉरेन्झो यांच्या मार्गदर्शनाखालील कोलंबियाने संपूर्ण सामन्यावर वर्चस्व राखले. विजयाचा फरक केवळ एका गोलचा असला, तरी प्रत्यक्षात कोलंबियाने अनेक संधी निर्माण केल्या आणि घानाला कायम दडपणाखाली ठेवले. कोलंबियाने सलग तिसऱ्या सामन्यात प्रतिस्पर्ध्याला गोल करण्यापासून रोखले. आता पुढील फेरीत त्यांची स्विट्झर्लंडशी गाठ पडणार आहे.

घानाचे आक्रमण संपूर्ण स्पर्धेत निराशाजनक ठरले. चार सामन्यांमध्ये मिळून घानाने एकूण केवळ चार फटकेच लक्ष्याच्या दिशेने मारले. या विश्वचषकात इराकनंतर हा दुसरा सर्वात खराब आकडा ठरला. याउलट, कोलंबियाने या एकाच सामन्यात घानाच्या संपूर्ण स्पर्धेतील कामगिरीपेक्षा दुप्पट फटके लक्ष्यावर मारले.

दुखापतीचा फटका

सुरुवातीच्या दहा मिनिटांत दोन्ही संघांना दुखापतींचा मोठा फटका बसला. कोलंबियाचा आघाडीचा खेळाडू जॉन कॉर्डोबा याला स्नायूची दुखापत झाल्याने त्याला मैदान सोडावे लागले. दुसरीकडे घानाचा उजवा बचावपटू मार्विन सेनाया पायाच्या दुखापतीमुळे बाहेर पडला.

अरियासची चमक

कॉर्डोबाच्या जागी आलेल्या लुईस सुआरेझने १४व्या मिनिटाला उजव्या बाजूने येगवान धाव घेत अचूक क्रॉस दिला. दूरच्या पोस्टजवळ असलेल्या अरियासने यावर अप्रतिम व्हॉली मारत चेंडू जाळ्यात धाडला. घानाचा बचावपटू सेइदूचे अरियासकडे दुर्लक्ष झाले आणि बचावातील ही चूक त्यांना महागात पडली.

गोल स्वीकारल्यानंतर घानाने काही प्रमाणात आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. मँचेस्टर सिटीचा आक्रमक अँटोईन सेमेन्योचा फटका बचावपटूला लागून बाहेर गेला. संपूर्ण स्पर्धेत त्याला एकदाही लक्ष्यावर फटका मारता आला नाही. मध्यंतरानंतरही कोलंबियाचेच वर्चस्व राहिले आणि त्यांनी सहज विजय नोंदवला.

इजिप्तची अचूकता निर्णायक

अर्लिंग्टन : इजिप्तने 'पेनल्टी शूटआऊट'मधील अचूक कामगिरीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाला नमवत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. इजिप्तचा बाद फेरीतील हा पहिला विजय ठरला. शूटआऊटपूर्वी ऑस्ट्रेलियाने गोलरक्षक बदलण्याचा निर्णय घेतला. पॅट्रिक बिचच्या जागी अनुभवी मॅट रायनला मैदानावर उतरविण्यात आले. मात्र, रायनला एकही फटका अडवता आला नाही.

नियमित वेळेतील १-१ अशा बरोबरीनंतर अतिरिक्त वेळेत दोन्ही संघांना गोलसंख्या वाढवता आली नाही. त्यामुळे 'पेनल्टी शूटआऊट'चा अवलंब करण्यात आला. यात इजिप्तने ४-२ अशी बाजी मारली. 'शूटआऊट'मध्ये ऑस्ट्रेलियासाठी जॅक्सन एर्विन आणि अवेर माबिल यांनी गोल केले. मात्र, हॅरी साऊटरचा फटका चुकला आणि १८ वर्षीय लुकास हेरिंग्टनचा फटका गोलपोस्टला लागला. याउलट इजिप्तच्या चारही खेळाडूंनी गोलचा अचूक वेध घेतला. गोल करणाऱ्यांमध्ये महमूद साबिर, रामी राबिया, लिव्हरपूलचा माजी खेळाडू मोहम्मद सलाह आणि होसाम अब्देलमागुइद यांचा समावेश होता. इजिप्तची पुढील उपांत्यपूर्व फेरीत अर्जेंटिनाशी गाठ पडेल.

त्याआधी, नियमित वेळेत इसाम अशूरने १३व्या मिनिटाला हेडरवर गोल करत इजिप्तला आघाडी मिळवून दिली. ऑस्ट्रेलियाने ५५व्या मिनिटाला बरोबरी साधली. इजिप्तचा बचावपटू मोहम्मद हानी याच्याकडून स्वयंगोल झाला. एकाच विश्वचषकात दोन स्वयंगोल करणारा तो पहिला खेळाडू ठरला. यापूर्वी, बेल्जियमविरुद्ध साखळी लढतीतही हानीकडून स्वयंगोल झाला होता.

सलाह भावुक : इजिप्तचा तारांकित आक्रमक आणि कर्णधार मोहम्मद सलाह रुग्णाच्या दुखापतीनंतरही या सामन्यात खेळला. त्याने 'शूटआऊट'मध्ये थक्क करणारी 'पानेन्का' किक मारत गोल केला. इजिप्तचा विजय निश्चित झाल्यानंतर सलाह भावुक झालेला दिसला.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

कार्यालय, व्यवस्थापक, पीएमजी ज्योती, एलबावरी बिल्डिंग, अंबेजोगाई रोड, जुना रेलवेचा नाका, इंदिरा नगर, लातूर - ४१३५३१.
दूरध्वनी क्र.०२३८२-२४०१५८,५९ ई-मेल : pln_lat@mahabank.co.in

सार्वजनिक आवाहन

नामनिर्देशन (Nomination) करा –
आपल्या कुटुंबाच्या सुरक्षित भविष्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल

प्रिय ग्राहक हो,

बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या सर्व माननीय ग्राहकांना विनम्र आवाहन करते की, आपल्या बचत खाते, चालू खाते, मुदत ठेव (FD), आवर्ती ठेव (RD) तसेच इतर पात्र खात्यांमध्ये अद्याप नामनिर्देशन (Nomination) केले नसेल, तर कृपया त्वरित करून घ्यावे.

नामनिर्देशन ही अत्यंत महत्त्वाची सुविधा असून, खातेदाराच्या दुर्दैवी निधनानंतर खात्यातील रक्कम किंवा ठेव योग्य व्यक्तीपर्यंत सुलभ व जलद पद्धतीने पोहोचण्यास मदत करते. यामुळे आपल्या कुटुंबाला अनावश्यक अडचणी, विलंब आणि कायदेशीर प्रक्रियेपासून दिलासा मिळतो.

आपण अद्याप नामनिर्देशन केले नसल्यास किंवा विद्यमान नामनिर्देशनात बदल अथवा अद्ययावत करावयाचे असल्यास, कृपया आपल्या जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेला भेट द्या. आमचे अधिकारी व कर्मचारी आपणास आवश्यक सहकार्य करतील.

आजच नामनिर्देशन करा – आपल्या कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेची खात्री करा.

नामनिर्देशन ही केवळ औपचारिकता नाही, तर आपल्या कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी आहे.

आजच आपल्या जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेला भेट द्या.

इन्स्टिट्यूट फॉर डिझाईन ऑफ इलेक्ट्रिकल मेजरींग इंन्स्ट्रुमेंट्स
एम एस एम ई - टेक्नॉलॉजी सेंटर, मुंबई
सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार
IDEMI

प्रवेश सुरु शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पात्रता १० वी पास

AICTE & MSBTE - मान्यताप्राप्त ३ वर्षीय डिप्लोमा कोर्सेस

डिप्लोमा इन टुल एंड डाई मेकींग (Mechanical)
मेकॅनिकल इंजिनीअरींग साठी (MSBTE EQUIVALENCE)
प्रात्यक्षिकांवर आधारीत टुल डीझाईन आणि टुल निर्मितीचे प्रशिक्षण दिले जाते.

अधिक माहीती साठी संपर्क साधा : 8976300878 / 7021221498

डिप्लोमा इन ३डी एनिमेशन एंड ग्राफीक्स
इंफोरमेशन टेक्नोलॉजी (IT) इक्वीव्हॅलेंट (MSBTE EQUIVALENCE)
हॅन्ड्स ऑन प्रॅक्टिकल ट्रेनिंग ग्राफिक्स डिझाईन, एडिटिंग, ॲनिमेशन, गेम इंजिन, स्पेशल इफेक्ट्स,फिल्म कम्पोझिटिंग, एडिटिंग आणि UX / UI Design, AR / VR Game Design, Generative AI

अधिक माहीती साठी संपर्क साधा : 9821473895 / 8291437525

डिप्लोमा इन रोबोटीक्स एंड मेकेट्रोनिक्स
मेकॅनिकल इंजिनीअरींग साठी (MSBTE EQUIVALENCE)
प्रात्यक्षिकांवर आधारीत मेकाट्रोनिक्स, रोबोटीक्स, ऑटोमेशन आणि एम्बेडेड सिस्टम्स, डिझाईन एंड डेव्हलपमेंट प्रशिक्षण दिले जाते.

अधिक माहीती साठी संपर्क साधा : 9819495547 / 9833292670

रजिस्ट्रेशन लिंक https://idemi.org/training/aicte
आयडीईएमआय, इरर्ल्न एक्सप्रेस हायवे, सुन्नाभाटी सायन, मुंबई
फोन.: ०२२ २७०४७४०१/२/३/४ EXTN.: २१३ / Email: training@idemi.org | Website: www.idemi.org

HINDUJA LEYLAND FINANCE

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड

कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): यू६५९९३एमएच२००८पीएलसी१८४२२१
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. सी-२१, टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१
कॉर्पोरेट कार्यालय: २२ए, डेक्कलंड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई, तामिळनाडू - ६०००३२
टेली.: (०४४) २२४२७५२५; **वेबसाईट:** https://hindujaleylandfinance.com/;
ईमेल: investorrelations@hindujaleylandfinance.com

नमुना क्र. सीएए.२

[कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३०(३) आणि कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ व ७ च्या अनुषंगाने]

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांचे समक्ष
कंपनी योजना अर्ज सी.ए. (सी.ए.ए.) /१०७/एमबी/२०२६

कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात
आणि
कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ सह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या प्रकरणात
आणि
हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड आणि एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड)
आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण योजनेच्या प्रकरणात

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींतर्गत स्थापित कंपनी आणि)
कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत अस्तित्वात असलेली कंपनी, नोंदणीकृत कार्यालय, प्लॉट क्र. सी-२१,)
टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५१.)
CIN: यू६५९९३एमएच२००८पीएलसी१८४२२१) .....पहिली अर्जदार कंपनी / हस्तांतरकर्ता कंपनी

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड च्या असुरक्षित धनकोंची सभा घेण्यात येणार असल्याची सूचना व सूचनेची जाहिरात

याद्वारे **सूचित** करण्यात येते की माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (''**माननीय न्यायाधिकरण**'') यांनी कंपनी योजना अर्ज क्र. सी.ए. (सीएए)/१०७/एमबी/२०२६ मध्ये पारित केलेल्या दि. १७ जून, २०२६ च्या आदेशान्वये (''**आदेश**'') त्यांनी इतर बाबींशिवाय असे निर्देश दिले की **हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड** (**हस्तांतरकर्ता कंपनी**'' **किंवा** ''**कंपनी**'') च्या सुरक्षित धनकोंची सभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग किंवा इतर दृकश्राव्य पद्धतीनी (**व्हीसी/ओएव्हीएम**'), (''**सभा**') घेण्यात यावी ज्यात हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड ते एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण करण्याची प्रस्तावित योजना (''**योजना**'') विचारात घेण्यात यावी, आणि योग्य वाटत असल्यास, बदलांसह किंवा बदलांशिवाय मंजूर करण्यात यावी.

माननीय एनसीएलटी यांचा सदर आदेश आणि त्यातील निर्देशांच्या अनुषंगाने कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ आणि त्याअंतर्गत इतर लागू नियमांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ (''**अधिनियम**'') मधील तरतुदींचे, आणि व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून आमसभा घेण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने जारी केलेल्या लागू सामान्य परिपत्रकांचे पालन करीत असुरक्षित धनकोंची आमसभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता घेण्यात येणार आहे आणि इंस्टीट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मीटींग्ज (''SS-2'') आणि सदर नियमांसह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील लागू तरतुदींचे पालन करीत असुरक्षित धनकोंना ई-मतदान सुविधा देण्यात येणार आहे. ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून राबविण्यात येणार असल्याने समभागधारकांनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही.

कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि दि. ०४ जुलै, २०२६ रोजीच्या सदर सूचनेची संबंधित जोडपत्रे यांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १०२ आणि सदर अधिनियमातील इतर लागू तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद २३०(३) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार दि. २६ जून, २०२६ रोजी न्या सभासदांचे ई-मेल ॲड्रेस कंपनी/डिपॉझिटरीज, डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स (DPs) / कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्स्फर एजंट - केफिन टेक्नोलॉजीज लिमिटेड / एमयुएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''**आरटीए**'') यांचेकडे आधीच नोंदविलेले आहेत त्यांना वर नमूद दि. ०४ जुलै, २०२६ रोजीची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे.

हस्तांतरकर्ता कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''**एनएसडीएल**'') च्या www.evoting.nsdl.com येथे योजनेसह खुलासापर विवरण आणि संबंधित जोडपत्रांसह सदर सूचनेची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

कुणाही असुरक्षित धनकोस सूचना, खुलासापर विवरण आणि योजनेची प्रत हवी असल्यास त्यासाठी ते हस्तांतरकर्ता कंपनीकडे २७ ए, डेव्हलप्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - ६०००३२, तामिळनाडू येथे विनंती पाठवू शकतात आणि हस्तांतरकर्ता कंपनी त्या असुरक्षित धनकोच्या नोंदणीकृत पत्त्यावर ते पाठवेल. त्याशिवाय, असुरक्षित धनको वर नमूद दस्तावेज सभा सुरु होण्यापूर्वी 48 तासांपर्यंत हस्तांतरकर्ता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून सर्व कामकाजाच्या दिवशी (शनिवार व रविवार सोडून) स. ११ (भाप्रवे) ते दु. १.०० वाजेपर्यंत (भाप्रवे) निशुल्क प्राप्त करू शकतात.

www.hindujaleylandfinance.com या कंपनीच्या वेबसाईटवर गुंतवणूकदार विभागांतर्गत सूचनेत नमूद केल्यानुसार दस्तावेजांची इलेक्ट्रॉनिक प्रत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून घेण्यात येत असल्याने असुरक्षित धनकोंनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार, सदर सभेसाठी हस्तांतरकर्ता कंपनीच्या असुरक्षित धनकोंनी प्रतिनिधी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध नाही. एनसीएलटी द्वारे भरविण्यात येणाऱ्या या सभेचे अध्यक्ष म्हणून माननीय न्यायाधिकरण यांचेद्वारे श्री देवी प्रसाद सेमवाल, आयआरएस (निवृत्त) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर अधिनियमातील अनुच्छेद २३०(६) नुसार कंपनीच्या आवश्यक बहुसंख्य असुरक्षित धनकोंनी ही योजना मंजूर केल्यास ती माननीय न्यायाधिकरण आणि आवश्यक वाटेल त्यानुसार इतर कोणत्याही नियामक किंवा वैधानिक प्राधिकरणे यांचेकडून इतर मंजुरया, परवानग्या आणि संमतीच्या अधीन असेल.

ई-मतदान:

एनसीएलटी यांच्या आदेशामधील तरतुदी आणि सुधारित कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १०८ आणि इतर लागू तरतुदी, SS-2, आणि ई-मतदानाच्या माध्यमातून आमसभा भरविण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने विहित केलेल्या आवश्यकतांच्या अनुषंगाने कंपनीद्वारे आपल्या असुरक्षित धनकोंना सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदान आणि सभा सुरु असताना एनएसडीएल द्वारे उपलब्ध करून देण्यात येणारी ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेस उपस्थित होण्याची आणि ई-मतदानाची तपशीलवार प्रक्रिया सभेच्या सूचनेचा भाग आहे. दूरस्थ ई-मतदानाशी संबंधित महत्त्वाचे तपशील खाली देण्यात आलेले आहेत:

ई-मतदानासाठी कट-ऑफ दिनांक	२३ जुलै, २०२६ (गुरुवार)
दूरस्थ ई-मतदान कालावधी सुरु होणे	२७ जुलै, २०२६ (सोमवार) रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे)
दूरस्थ ई-मतदान कालावधी समाप्ती	२९ जुलै, २०२६ (बुधवार) रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे)

त्यानंतर एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल. कंपनीद्वारे सभेमध्येसुद्धा ई-मतदानाची सुविधा देण्यात येत आहे. असुरक्षित धनकोंचे मतदान हक्क कट-ऑफ दिनांकास म्हणजे २३ जुलै, २०२६ रोजी त्यांच्या थकबाकीच्या मूल्याच्या गुणोत्तराच्या प्रमाणात असतील. कट-ऑफ दिनांकास ज्या व्यक्तीचे नाव कंपनी / आरटीए कडे असुरक्षित धनको म्हणून नोंदविलेले असेल त्यांनाच मतदान करता येईल.

असुरक्षित धनकोंना सभा सुरु असताना ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी (सभेच्या अगोदर) दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून त्रयावर मतदान केलेले नसेल त्यांना सभेत त्या त्रयावर मतदान करता येईल. सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून त्रयावर मतदान करणारया असुरक्षित धनकोंना व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होता येईल, परंतु त्या त्रयावर पुन्हा मतदान करता येणार नाही. सभेच्या दिवशी सभा संपल्यानंतर १५ मिनिटांनी एनएसडीएल द्वारे ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल.

कट-ऑफ दिनांकानंतर कंपनीचे असुरक्षित धनको होणाया एखाद्या व्यक्तीस सभेचे कामकाज पाहायचे असल्यास ते त्यासाठी एनएसडीएल यांचेकडे evoting@nsdl.com येथे किंवा कंपनी/आरटीए कडे विनंती करून लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतात. परंतु, अशा व्यक्तीस त्रयावर मतदान करता येणार नाही.

ज्या असुरक्षित धनकोंनी आपले ई-मेल ॲड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना विनंती आहे की ते डीमॅट स्वरुपात समभाग धारण करीत असल्यास त्यांनी ते डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडे नोंदवावेत. ज्या असुरक्षित एनसीडी धारकांचे ईमेल ॲड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना विनंती आहे की त्यांनी नोंदणीकृत पत्त्यावर सभेची सूचना देणारी छापील पत्रे पाठविण्यात येत आहेत.

माननीय न्यायाधिकरण यांनी दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया तसेच सभा सुरु असताना ई-मतदान योग्य व पारदर्शक पद्धतीने पार पडावे यासाठी परिनिरीक्षण करण्यासाठी हस्तांतरकर्ता कंपनीचे परिनिरीक्षक म्हणून आणि सभा समाप्त झाल्यापासून ३ (तीन) दिवसांचे आत झालेल्या मतदानाबाबत सभेच्या अध्यक्षांकडे किंवा अध्यक्षांनी अधिकृत केलेल्या कुणाही व्यक्तीकडे अहवाल सादर करण्यासाठी प्रणव डी. वैद्य & कं., कंपनी सचिव, व्यवसाय परवाना क्र. २४३३९ यांची नियुक्ती केलेली आहे.

त्यानुसार, असुरक्षित धनकोंना विनंती आहे की त्यांनी वर नमूद पद्धतीने, दिनांकास व वेळी सभेस उपस्थित व्हावे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होणारया असुरक्षित धनकोंची उपस्थिती सदर अधिनियमातील अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमसाठी ग्राह्य धरण्यात येईल. सभा सुरु होताना सभेसाठी सदर उल्लेखित कोरम उपस्थित नसल्यास सभा ३० मिनिटांसाठी बरखास्त करण्यात येईल, त्यानंतर, उपस्थित असुरक्षित धनको हेच कोरम आहे असे समजण्यात येईल.

०१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत मतदानाचे निकाल कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि एनएसडीएल च्या वेबसाईटवर www.evoting.nsdl.com येथे प्रदर्शित करण्यात येतील, शिवाय बीएसई लिमिटेड यांचेकडेसुद्धा पाठविण्यात येतील.

काही प्रश्न / तक्रारी असल्यास, असुरक्षित धनको सदरील सूचनेशी संबंधित सहस्रा विचारणारा येणारे प्रश्न (''FAQs'') पाहू शकतात किंवा १८०० २२२ ९९० वर कॉल करू शकतात किंवा www.evoting.nsdl.com येथे विनंती पाठवू शकतात किंवा एनएसडीएल च्या पत्तावी म्हाते यांचेशी evoting@nsdl.com येथे संपर्क साधू शकतात.

स्था/-
स्थान: ग्रेटर नोएडा **देवी प्रसाद सेमवाल**
दिनांक: ०४ जुलै, २०२६ **सभेसाठी नियुक्त अध्यक्ष**

हे पत्र वैदेही ठक्कर यांनी मालक व ट्रेडिंग

दोन बसच्या अपघातात चालकांसह विद्यार्थी जखमी

जालना : जालना जिल्ह्यातील अंबड ते वडिगोद्री रस्त्यावरील शहापूर गावाच्या शिवारात दोन एस.टी. बसची समोरासमोर धडक झाली. शनिवारी सकाळी झालेल्या या अपघातात दोन्ही एस.टी.बसचे चालक आणि काही शाळकरी विद्यार्थी जखमी झाले. एका बसमध्ये पंचवीस ते तीस शालेय विद्यार्थी होते तर दुसऱ्या बसमध्ये पंधरा ते वीस प्रवाशी होते. मानव विकास मिशनच्या एस.टी. बसमधून हे विद्यार्थी शाळेकडे निघाले होते. भोंबरी गावातील शाळकरी विद्यार्थ्यांना घेऊन बस अंबडकडे निघाली होती. याच वेळी समोरून येणारी बस आणि या बसमध्ये टक्कर झाली. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनीही घटनास्थळाकडे धाव घेतली.

भंडारदरात ३० टक्के साठा, मुळा नदी प्रवाहित

पिंपळगावखांड तलाव तुडुंब

लोकसत्ता वार्ताहर

अकोले: मुळा नदीवरील ६०० दलघफू क्षमतेचा पिंपळगावखांड लघु पाटबंधारे तलाव भरून वाहू लागला. त्यामुळे मुळा नदी वाहती झाली आहे. आंबित नंतर तालुक्यातील भरलेला हा दुसरा तलाव. दुसरीकडे जिल्ह्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणारे भंडारदरा धरण ३० टक्के भरले आहे. आज, शनिवारी सलग पाचव्या दिवशी धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार सुरू होती.

मुळा, भंडारदरा धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मान्सून सक्रिय झाला असून, चार दिवसांपासून कळसूबाई, रतनगड, हरिश्चंद्रगडाच्या डोंगररांगांमध्ये चांगला पाऊस पडत आहे. हरिश्चंद्रगड परिसरात मुळा नदी उगम पावते. पाच हजार मिमीपेक्षा अधिक पाऊस या परिसरात पडतो. मुळा नदीच्या उगमस्थानाजवळ असणारा आंबित तलाव २७ जून रोजीच भरला होता. त्या पाठोपाठ पिंपळगावखांड तलाव काल, शुक्रवारी सायंकाळी भरला व तलावाच्या सांडव्यावरून नदीचे पाणी मुळा धरणाकडे झेपावले.

तालुक्यात आज नोंदला गेलेला पाऊस मिमीमध्ये पुढीलप्रमाणे : घाटघर ८६, रतनवाडी ४०, पांजरे ५७, भंडारदरा ६०, वाकी ४६, निळवंडे २४, अकोले ११, आढळा धरण ६.

वाहती झालेल्या मुळा नदीचे पाणी आता मुळा धरणात साठविले जाईल. आज सकाळी मुळा धरणाकडे १ हजार ३९३ क्युसेकने पाण्याची आवक सुरू होती, तर दुपारी त्यात १ हजार ७३३ क्युसेकपर्यंत वाढ झाली होती. मुळा नदी वाहती झाल्यामुळे अकोले तालुका, तसेच संगमनेरच्या पठार भागातील नदीकाठच्या गावांना दिलासा मिळाला आहे. भंडारदरा पाणलोट क्षेत्रातही पाऊस सुरूच असून, आज धरणात २१८ दलघफू पाण्याची भर पडली. सकाळी भंडारदरा धरणाचा पाणीसाठा ३ हजार २३४ दलघफू (२९.३० टक्के) होता. भंडारदरा ते रंधा धबधब्यापर्यंतचे काही ओढे वाहू लागले आहेत. त्यामुळे निळवंडे धरणात आज २ दलघफू नवीन पाणी आले. कृष्णवंती या प्रकारच्या उपनदीवरील वाकी तलाव भरल्यानंतरच निळवंडे धरणात पाण्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू होईल. निळवंडे धरणात सध्या १ हजार ५५८ दलघफू (१८.६९ टक्के) पाणी शिल्लक आहे.

जिल्ह्यात खरिपाच्या केवळ २० टक्के क्षेत्रावर पेरण्या

जोरदार पावसाची प्रतीक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : जिल्ह्यात सर्वत्र पावसाला सुरूवात झाली असली, तरी अद्याप पेरणीसाठी आवश्यक पावसाची प्रतीक्षा आहे. काही तालुक्यांत झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, मात्र अनेक भागातील शेतकरी समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. जिल्ह्यात झालेल्या पावसावर अल्प प्रमाणात, म्हणजे केवळ २० टक्के पेरणी झाली आहे.

मान्सूनने जिल्ह्यात तीन आठवडे विलंबाने हजेरी लावली. त्यामुळे रखडलेल्या पेरण्यांना काही प्रमाणात वेग मिळण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात जामखेड, कर्जत हे दोन तालुके वगळता अन्य सर्वच तालुक्यांत दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. जुलै महिना सुरू झाला, तरी समाधानकारक पाऊस नाही. जून महिन्यात सरासरी १०८.२ मिमी पावसाची नोंद होते. मात्र यंदा प्रत्यक्षात ४३.६ मिमी. पाऊस झाला. ६५ मिमी पावसाची घट आहे. आठ दिवसात जिल्ह्याच्या काही भागात पाऊस झालेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. दमदार पावसाने हजेरी लावली नसल्याने जिल्ह्यात खरीप हंगामाच्या विविध पिकांच्या पेरण्या खोळंबल्या आहेत. हमखास पावसाचे मृग नक्षत्र कोरडे गेल्याने शेतकऱ्यांचे डोळे आभाळाला लागले आहेत.

जिल्ह्यात खरिपासाठी सरासरी ५ लाख ७९ हजार ७६८ हेक्टर क्षेत्र असून, त्यांपैकी आतापर्यंत १ लाख १७ हजार १३१ हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या विविध पिकांची पेरणी झाली आहे. पेरणीयोग्य पाऊस नसल्यामुळे खरिपातील पेरणी अल्प प्रमाणात आहे. सध्या तरी शेतकरी पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

पीकनिहाय पेरणीची आकडेवारी पुढीलप्रमाणे

अकोले तालुक्यात रोपवाटिका प्रक्षेत्रावर १०५९ हेक्टर क्षेत्रावर भात रोपे तयार करण्यात आली आहेत. बाजरी- १ लाख ५० हजार ९८३ हेक्टरपैकी ६ हजार ६३१ हेक्टरवर पेरणी (४.४ टक्के), मका - ६० हजार ७९८ हेक्टरपैकी १२ हजार ८०४ हेक्टर (२१.१ टक्के), तूर- ३६ हजार १०४ हेक्टरपैकी १६ हजार ९५२ हेक्टर पेरणी (४७ टक्के), मूग- ४७ हजार ३६ हेक्टरपैकी २ हजार ७७३ हेक्टर पेरणी (५.९ टक्के), उडीद- ४० हजार ४०५ हेक्टरपैकी ६ हजार ६२५ हेक्टर पेरणी (१६.४ टक्के), सोयबीन- ८७ हजार ३३० हेक्टरपैकी १३ हजार ९५५ हेक्टर पेरणी (१६ टक्के), कापूस - १ लाख २२ हजार ८६ हेक्टरपैकी ५५ हजार ७८ हेक्टर पेरणी (४५ टक्के)

CFN thoughtful regeneration
सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय : पहिला मजला, वेकफिल्ड हाऊस, स्प्लॉट रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई -४००००१.

ताबा सूचना
परिशिष्ट IV (अचल मालमत्ता करिता) [नियम - ८(१)सह वाचलेले]

ज्याअर्थी, सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्र. लि. (सीएफएमएआरसी ट्रस्ट - १९६ चे विश्वस्त म्हणून त्यांच्या क्षमतेत कार्यरत), चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स ॲंड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (2002 चा 54) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13 (12), 13(2) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत मागणी सूचना पाठवली न्यात सदर नोटीस मिळाल्यापासून सात्तेपासून 60 दिवसांच्या आत नोटीसमध्ये नमूद केलेली ताब्या पत्र करण्याचे आव्हान करण्यात आले होते. पुढे, सर्वश्री फिनलेअर प्रायव्हेट लिमिटेड यांनी सरफेसी कायदा 2002 च्या कलम 5 च्या तरतुदीसह सर्वश्री फिनलेअर प्रायव्हेट लिमिटेड आणि वीएएमए ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद दि. 04.11.2025 रोजी झालेल्या नोंदणीकृत हस्तांतरण करारानामाद्वारे, उपरोक्त कर्ज खात्याच्या संपूर्ण थकबाकी कर्जाचे, आंतर्गहित प्रतिभूतीसह, आपले सर्व हक्क, मालकी आणि हितसंबंध सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या नावे हस्तांतरित केले आहेत.
कर्जदार सदर कंपनीची पतहेड करण्यात अलास्थी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, खालील स्वाक्षरीकार यांनी उक्त नियमांच्या नियम 8 सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम 13 (4) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, वरील "ताबा दिनांक" या तक्त्यात नमूद केलेल्या दिनांकास वर वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** घेतला आहे. पक्षकारांचा तपशील आणि बँकेने घेतलेल्या ताब्या मालमत्तेच्या तपशील खाली दिला आहे :-

ग्राहक (कर्जदार, प्रमोटर आणि जामीनदार / भागीदार / गहाणदार) यांचे नाव	मागणी सूचना दिनांक आणि खात्र रु.मध्ये	ताबा दिनांक
दिपक एकनाथ खोसे (कर्जदार), सोनाली दिपक खोसे (सह-कर्जदार), कर्ज खाते क्र. : FLSEC00006508	मागणी सूचना दिनांक : 06-03-2026 रु. 2,02,060/- (रुपये दोन लाख दोन हजार सात फक्त) दि. 30-01-2026 रोजी नुसार	01.07.2026

ताबा मालमत्ता : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, मालमत्ता क्र. 172 मोजमाप 348 चौ. फू. गाव : आघुर्ण, ता. : पारनेर, जिल्हा : आहमदनगर येथे स्थित. ज्याची चतुःसीमा पुढीलप्रमाणे. चतुःसीमा :- पूर्व किंवा त्या दिशेने - गावठाण, पश्चिम किंवा त्या दिशेने - रमेश खोसे यांची मालमत्ता, दक्षिण किंवा त्या दिशेने - किरण खोसे यांची मालमत्ता, उत्तर किंवा त्या दिशेने हे गावठाण.

वर नमूद केलेल्या कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी या मालमत्तेच्या व्यवहाराबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार, **सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड** यांच्या या सूचनेत नमूद केलेल्या रकमेसाठी, या मालमत्ते करागनुसार दहाने व्याज, अनुषंगिक खर्च, शुल्क इ. या रकमेच्या भारधीन असेल, जे उपरोक्त तपशिलात दर्शविलेल्या थकबाकीच्या स्थितीच्या तारखेच्या दुसऱ्या तारखेपासून, पूर्ण परतफेड आणि/किंवा वसुलीच्या तारखेपर्यंत देय असतील. पुढे कर्जदारांचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे वेधले गेले, जे ताबण ठेवलेल्या मालमत्तेची परतफेड करण्यासाठी उपलब्ध वेळेसंदर्भात आहेत.
कृपया नोंद घ्यावी की मालमत्तेचे वर्णन वर नमूद केल्याप्रमाणे आहे.

दिनांक : 05.07.2026
ठिकाण : अहमदनगर
प्राधिकृत अधिकारी, सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
(सीएफएमएआरसी ट्रस्ट - १९६ चे विश्वस्त म्हणून त्यांच्या क्षमतेत कार्यरत)

HINDUJA LEYLAND FINANCE
हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड
कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): यू६५९९३१एमएचर००८पीएलसी३८४२२१
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. सी-२१, टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१
कॉर्पोरेट कार्यालय: २२ए, डेक्हलण्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई, तामिळनाडू - ६०००३२
टेली.: (०४४) २२४२७५२५; **वेबसाईट:** https://hindujaleylandfinance.com/;
ईमेल: investorrelations@hindujaleylandfinance.com

नमुना क्र. सीएए.२

[कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३०(३) आणि कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ व ७ च्या अनुषंगाने]

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांचे समक्ष
कंपनी योजना अर्ज सी.ए. (सी.ए.ए.) /१०७/एमबी/२०२६

कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात
आणि
कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ सह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या प्रकरणात
आणि
हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड आणि एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण योजनेच्या प्रकरणात

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींतर्गत स्थापित कंपनी आणि)
कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत अस्तित्वात असलेली कंपनी, नोंदणीकृत कार्यालय, प्लॉट क्र. सी-२१,)
टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५१.)
CIN: यू६५९९३एमएचर००८पीएलसी३८४२२१) .....पहिली अर्जदार कंपनी / हस्तांतरकर्ता कंपनी

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड च्या असुरक्षित धनकोंची सभा घेण्यात येणार असल्याची सूचना व सूचनेची जाहिरात

याद्वारे **सूचित** करण्यात येते की माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (''**माननीय न्यायाधिकरण**'') यांनी कंपनी योजना अर्ज क्र. सी.ए. (सीएए)/१०७/एमबी/२०२६ मध्ये पारित केलेल्या दि. १७ जून, २०२६ च्या आदेशान्वये (''**आदेश**'') त्यांनी इतर बाबींशिवाय असे निर्देश दिले की **हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड** (''**हस्तांतरकर्ती कंपनी**'' **किंवा** ''**कंपनी**'') च्या सुरक्षित धनकोंची सभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग किंवा इतर दक्षप्राय पद्धतीनी (''**व्हीसी/ओएव्हीएम**'', (''**सभा**'') घेण्यात यावी ज्यात हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड चे एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण करण्याची प्रस्तावित योजना (''**योजना**'') विचारात घेण्यात यावी, आणि योग्य वाटत असल्यास, बदलांसह किंवा बदलांशिवाय मंजूर करण्यात यावी.

माननीय एनसीएलटी यांचा सदर आदेश आणि त्यातील निर्देशांच्या अनुषंगाने कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ आणि त्याअंतर्गत इतर लागू नियमांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ (''**अधिनियम**'') मधील तरतुदींचे, आणि व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून आमसभा घेण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने जारी केलेल्या लागू सामान्य परिपत्रांचे पालन करीत असुरक्षित धनकोंची आमसभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता घेण्यात येणार आहे आणि इंस्टीट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मीटींग (''SS-2'') आणि सदर नियमांसह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील लागू तरतुदींचे पालन करीत असुरक्षित धनकोंना ई-मतदान सुविधा देण्यात येणार आहे. ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून शक्यतो घेण्यात असल्याने समभागधारकांनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही.

कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि दि. ०४ जुलै, २०२६ रोजीच्या सदर सूचनेची संबंधित जोडपत्रे यांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १०२ आणि सदर अधिनियमातील इतर लागू तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद २३०(३) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार दि. २६ जून, २०२६ रोजी त्या सभासदांचे ई-मेल अ‍ॅड्रेस कंपनी/डिपॉझिटरीज, डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स (DPs) / कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्स्फर एजंट - केफिन टेक्नोलॉजीज लिमिटेड / एमयुएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''**आरटीए**'') यांचेकडे आधीच नोंदविलेले आहेत त्यांना वर नमूद दि. ०४ जुलै, २०२६ रोजीची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे.

हस्तांतरकर्ता कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''**एनएसडीएल**'') च्या www.evoting.nsdl.com येथे योजनेसह खुलासापत्र विवरण आणि संबंधित जोडपत्रांसह सदर सूचनेची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

कुणाही असुरक्षित धनकोस सूचना, खुलासापत्र विवरण आणि इतर दस्तावेजांची छापील प्रत हवी असल्यास त्यासाठी हे हस्तांतरकर्ती कंपनीकडे २७० ए, डेव्हलप्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - ६०००३२, तामिळनाडू येथे विनंती पाठवू शकतात आणि हस्तांतरकर्ता कंपनी त्या असुरक्षित धनकोस नोंदणीकृत पत्त्यावर ते पाठवेल. त्याशिवाय, असुरक्षित धनको वर नमूद दस्तावेज सभा सुरु होण्यापूर्वी 48 तासांपर्यंत हस्तांतरकर्ता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून सर्व कामकाजाच्या दिवशी (शनिवार व रविवार सोडून) स. ११ (भाप्रवे) ते दु. १.०० वाजेपर्यंत (भाप्रवे) निःशुल्क प्राप्त करू शकतात.

www.hindujaleylandfinance.com या कंपनीच्या वेबसाईटवर गुंतवणूकदार विभागांतर्गत सूचनेत नमूद केल्यानुसार दस्तावेजांची इलेक्ट्रॉनिक प्रत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून घेण्यात येत असल्याने असुरक्षित धनकोंनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार, सदर सभेसाठी हस्तांतरकर्ता कंपनीच्या असुरक्षित धनकोंनी प्रतिनिधी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध नाही. एनसीएलटी द्वारे भरविण्यात येणाऱ्या या सभेचे अध्यक्ष म्हणून माननीय न्यायाधिकरण यांचेद्वारे श्री देवी प्रसाद सेमवाल, आयआरएस (निवृत्त) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर अधिनियमातील अनुच्छेद २३०(६) नुसार कंपनीच्या आवश्यक बहुसंख्या असुरक्षित धनकोंनी ही योजना मंजूर केल्यास ती माननीय न्यायाधिकरण आणि आवश्यक वाटेल त्यानुसार इतर कोणत्याही नियामक किंवा वैधानिक प्राधिकरणे यांचेकडून इतर मंजुरया, परवानग्या आणि संमतीच्या अधीन असेल.

ई-मतदान:

एनसीएलटी यांच्या आदेशामधील तरतुदी आणि सुधारित कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १०८ आणि इतर लागू तरतुदी, SS-2, आणि ई-मतदानाच्या माध्यमातून आमसभा भरविण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने विहित केलेल्या आवश्यकतांच्या अनुषंगाने कंपनीद्वारे आपल्या असुरक्षित धनकोंच्या अगोदर दुरस्थ ई-मतदान आणि सभा सुरु असताना एनएसडीएल द्वारे उपलब्ध करून देण्यात येणारी ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेस उपस्थित होण्याची आणि ई-मतदानाची तपशीलवार प्रक्रिया सभेच्या सूचनेचा भाग आहे.

दूरस्थ ई-मतदानाशी संबंधित महत्त्वाचे तपशील खाली देण्यात आलेले आहेत:

ई-मतदानासाठी कट-ऑफ दिनांक	२३ जुलै, २०२६ (गुरुवार)
दूरस्थ ई-मतदान कालावधी सुरु होणे	२७ जुलै, २०२६ (सोमवार) रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे)
दूरस्थ ई-मतदान कालावधी समाप्ती	२९ जुलै, २०२६ (बुधवार) रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे)

त्यानंतर एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल. कंपनीद्वारे सभेमध्येसुद्धा ई-मतदानाची सुविधा देण्यात येत आहे. असुरक्षित धनकोंचे मतदान हक्क कट-ऑफ दिनांकास म्हणजे २३ जुलै, २०२६ रोजी त्यांच्या थकबाकीच्या मूल्याच्या गुणोत्तराच्या प्रमाणात असतील. कट-ऑफ दिनांकास ज्या व्यक्तीचे नाव कंपनी / आरटीए कडे असुरक्षित धनको म्हणून नोंदविलेले असेल त्यांनाच मतदान करता येईल.

असुरक्षित धनकोंना सभा सुरु असताना ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी (सभेच्या अगोदर) दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून ठरावावर मतदान केलेले नसेल त्यांना सभेत त्या ठरावावर मतदान करता येईल. सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून ठरावावर मतदान करणारया असुरक्षित धनकोंना व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होता येईल, परंतु त्या ठरावावर पुन्हा मतदान करता येणार नाही. सभेच्या दिवशी सभा संपल्यानंतर १५ मिनिटांनी एनएसडीएल द्वारे ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल.

कट-ऑफ दिनांकानंतर कंपनीचे असुरक्षित धनको होणारया एखाद्या व्यक्तीस सभेचे कामकाज पाहायचे असल्यास ते त्यासाठी एनएसडीएल यांचेकडे evoting@nsdl.com येथे किंवा कंपनी/आरटीए कडे विनंती करून लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतात. परंतु, अशा व्यक्तीस ठरावावर मतदान करता येणार नाही.

ज्या असुरक्षित धनकोंनी आपले ई-मेल अ‍ॅड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना विनंती आहे की ते डीमॅट स्वरूपात समभाग धारण करीत असल्यास त्यांनी ते डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडे नोंदवावेत. त्या असुरक्षित एनसीडी धारकांचे ईमेल अ‍ॅड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर सभेची सूचना देणारी छापील पत्रे पाठविण्यात येत आहेत.

माननीय न्यायाधिकरण यांनी दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया तसेच सभा सुरु असताना ई-मतदान योग्य व पारदर्शक पद्धतीने पार पडावे यासाठी परिनियोजन करण्यासाठी हस्तांतरकर्ता कंपनीचे परिनियोजक म्हणून आणि सभा समाप्त झाल्यापासून ३ (तीन) दिवसांचे आत झालेल्या मतदानाबाबत सभेच्या अध्यक्षांकडे किंवा अध्यक्षांनी अधिकृत केलेल्या कुणाही व्यक्तीकडे अहवाल सादर करण्यासाठी प्रणय डी. वैद्य & कं., कंपनी सचिव, व्यवसाय परामर्श द्वारे २४३३९ यांची नियुक्ती केलेली आहे.

त्यानुसार, असुरक्षित धनकोंना विनंती आहे की त्यांनी वर नमूद पद्धतीने, दिनांकास व वेळी सभेस उपस्थित व्हावे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होणारया असुरक्षित धनकोंची उपस्थिती सदर अधिनियमातील अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमसाठी ग्राह्य धरण्यात येईल. सभा सुरु होताना सभेसाठी सदर उल्लेखित कोरम उपस्थित नसल्यास सभा ३० मिनिटांसाठी बरखास्त करण्यात येईल, त्यानंतर, उपस्थित असुरक्षित धनको हेच कोरम आहे असे समजण्यात येईल.

०१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत मतदानाचे निकाल कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि एनएसडीएल च्या वेबसाईटवर www.evoting.nsdl.com येथे प्रदर्शित करण्यात येतील, शिवाय बीएसई लिमिटेड यांचेकडेसुद्धा पाठविण्यात येतील.

काही प्रश्न / तक्रारी असल्यास, असुरक्षित धनको धनकोंसाठी सहसा विचारण्यात येणारे प्रश्न (''FAQs'') पाहू शकतात किवा १८०० २२२ ९९० वर कॉल करू शकतात किवा www.evoting.nsdl.com येथे विनंती पाठवू शकतात किवा एनएसडीएल च्या पल्लवी म्हात्रे यांचेशी evoting@nsdl.com येथे संपर्क साधू शकतात.

स्थान: ग्रेटर नोएडा
दिनांक: ०४ जुलै, २०२६
स्वा/-
देवी प्रसाद सेमवाल
सभेसाठी नियुक्त अध्यक्ष

'बीएलओ' कामात टाळाटाळ; प्राथमिक शिक्षक निलंबित

लोकसत्ता वार्ताहर

कर्जत : निवडणूक कामासारख्या राष्ट्रीय कर्तव्यात हेतूपूरस्सर टाळाटाळ करणाऱ्या शिक्षकावर जिल्हा परिषदेने कारवाई केली आहे. गणेशवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे पदवीधर शिक्षक रामकृष्ण मारुती शेटे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सेवेतून निलंबित केले आहे. या घटनेने तालुक्यामध्ये व शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

रामकृष्ण शेटे यांची मतदान केंद्र अधिकारी (बीएलओ, क्र. ३२७) म्हणून नेमणूक करण्यात आली होती. मात्र, त्यांनी राष्ट्रीय कामात टाळाटाळ केल्याचा ठपका ठेवत कर्जत पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांनी दि. ३० जूनला अहवाल सादर केला. भारतीय लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० चे कलम १३४ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा वर्तणूक नियम १९६७ चा भंग केल्याचे कारण देत ही कारवाई करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी २ जुलैला निलंबनाचे आदेश काढले. आदेश अंमलात असेपर्यंत शेटे यांचे मुख्यालय जामखेड पंचायत समिती राहील. जामखेडच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय मुख्यालय सोडल्यास कारवाई यासह इतर बंधने शेटे यांना लागू असतील. मतदार यादी अद्ययावत करणे, नवीन मतदार नोंदणी, मृत-स्थलांतरित नावे वगळणे ही 'बीएलओ'ची जबाबदारी. या कामात टाळाटाळ केल्याने कारवाई करण्यात आली.

अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी रेल्वेसाठी प्रवासी संघटनेचे जनआंदोलन

अहिल्यानगर : अहिल्यानगर-पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांच्या दैनंदिन समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी या मार्गावर स्वतंत्र इंटरसिटी रेल्वेसेवा सुरू व्हावी, या प्रमुख प्रमुख मागणीसाठी जिल्हा प्रवासी संघटना 'मिशन २५ हजार प्रवासी अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी जनआंदोलन' सुरू करणार असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

प्रवाशांच्या समस्या मांडणाऱ्या 'माझा प्रवास माझा संघर्ष' या नावाने५ हजार ध्वनिचित्रफीती तयार करून त्या समाजमाध्यमातून राज्य सरकार व रेल्वे प्रशासनाकडे पाठवणार आहे. हे आंदोलन नागरिकांच्या सहभागातून, पक्षनिरपेक्ष आणि लोकहिताच्या भावनेतून उद्या, रविवारापासून सुरू करण्यात येत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

अहिल्यानगर आणि पुणे या दोन शहरांदरम्यान रोज हजारो विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक, औद्योगिक कर्मचारी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, तसेच विविध आजारांवर उपचारासाठी जाणारे रुग्ण प्रवास करतात. मात्र वाढती वाहतूककोंडी, वेळेचा होणारा मोठा अपव्यय, वाढलेला इंधन व प्रवास खर्च, खासगी वाहनांवरील अवलंबित्व आणि सार्वजनिक वाहतुकीतील अपुऱ्या सुविधा यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेनची मागणी सातत्याने होत असली, तरी अद्याप या मागणीची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे आता नागरिकांच्या सहभागातून शासन आणि रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'मिशन २५ हजार प्रवासी' ही जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. या अभियानात जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील संस्था व संघटनांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या अभियानासाठी अर्शद शेख, संदेश रापारिया, विपुल शाह, सुनील छाजेड, अजय दिघे, संतोष बडे, सुनील थोरात, संजय चव्हाण, संजय वाळुंज आदींनी पुढाकार घेतला आहे. जनआंदोलनाच्या अधिक माहितीसाठी हरजीतसिंग वधवा (९४२३१६२७२७), प्रशांत मुनोत (९४२२२२९६९९), संजय सपकाळ (९८९०२२८९६४) आणि अशोक कानडे (९८२२०९३६३६) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आहे.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

OnlyFresherHire
IT व इंजिनिअरिंग फ्रेशर्स जॉब्स!
• सॉफ्टवेअर • टेस्टिंग • सपोर्ट
• थेट IT कंपन्यांकडून मुलाखती
SCAN ME
onlyfresherhire.com
स्कॅन करा → मोफत नोंदणी करा

वृद्धाश्रम

पूर्णपणे थकलेल्या, वयोवृद्ध, आजारी, बेडरिडन, आजी/आजोबांची घरच्याप्रमाणे शेवटपर्यंत काळजी घेणारे" पा ओल्ड एज होम' सुरेंद्र जोशी - 8275395735, राजहंस सर - 9130744811.
0090406109-1

वयोवृद्ध सेवानिवृत्त एकाकी जीवन जगणारया व्यक्तीची आयुष्य भराची सोय. ऍडमिशन नंतर आजारपण, हॉस्पिटल सेवा, सुश्रुषा, शेवटपर्य

अमेरिकेच्या सामन्यात प्रेक्षकसंख्येचा विक्रम

न्यूयॉर्क : अमेरिकेने बोलिव्या-हर्जेगोविनाविरुद्ध विजय मिळवत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. या सामन्याने अमेरिकेत इंग्रजी भाषेतील फुटबॉल प्रसारणाच्या इतिहासात सर्वाधिक प्रेक्षकसंख्येचा विक्रम नोंदवला. फॉक्स स्पोर्ट्समुसार, हा सामना २ कोटी ४४ लाख प्रेक्षकांनी पाहिला. २००२ नंतर अमेरिका संघाचा हा विश्वचषक बाद फेरीतील पहिला विजय ठरला. या सामन्याने २०१५च्या 'फिफा' महिला विश्वचषक अंतिम सामन्याचा २ कोटी २३ लाख प्रेक्षकांचा विक्रम मोडला. अमेरिकेत इंग्रजी व्यतिरिक्त अन्य भाषांतही प्रसारण केले जाते.

१३

ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध इंडोनेशियाच्या मोहम्मद हानी याच्याकडून स्वयंगोल झाला. यंदाच्या विश्वचषकातील हा विक्रमी १३वा स्वयंगोल ठरला. याआधी २०१८ विश्वचषक स्पर्धेत १२ स्वयंगोल झाले होते.

अतिरिक्त वेळेतील स्वयंगोल अर्जेंटिनाच्या पथ्यावर

केप व्हर्डेपुढे जगज्जेत्यांचाही संघर्ष

वृत्तसंस्था, मियामी

स्पेनविरुद्धची ऐतिहासिक बरोबरी, गटातून दमदार आगेकूच आणि बाद फेरीतील संस्मरणीय खेळ अशा स्वप्नवत प्रवासानंतर केप व्हर्डेचे पदार्पणाच्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील आव्हान अखेर संपुष्टात आले. मात्र, 'राउंड ऑफ ३२'च्या लढतीत त्यांनी गतविजेत्या अर्जेंटिनाला दिलेला लढा आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील या छोट्याशा बेटाची फुटबॉल प्रतिभा जगाला दाखविण्यासाठी पुरेसा ठरला. स्पर्धेत सर्वाधिक चर्चेत असलेला केप व्हर्डेचा गोलरक्षक वोझिन्याने लिओनेल मेसीसह अर्जेंटिनाच्या अन्य आक्रमकांचे तब्बल आठ फटके लीलया परतवून लावले. मात्र, अतिरिक्त वेळेत झालेल्या स्वयंगोलमुळे केप व्हर्डेची निराशा झाली आणि अर्जेंटिनाने ३-२ असा निसटता विजय मिळवत उपउपांत्यपूर्व फेरी गाठली.

'फिफा' क्रमवारीत ६४व्या स्थानावर असलेल्या केप व्हर्डेने दोन वेळा पिछाडीवरून पुनरागमन करत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावरील अर्जेंटिनाशी बरोबरी साधली. विश्वचषक इतिहासातील सर्वात मोठ्या धक्क्यांपैकी एक नोंदविण्याच्या उंबरठ्यावर हा संघ पोहोचला होता. मात्र, अखेरीस १११व्या मिनिटाला मेसीने घेतलेल्या कॉर्नर किकवर ख्रिस्तियन रोमेरोच्या हेडरला केप व्हर्डेचा खेळाडू डिनेय बोजेसचा हलकासा स्पर्श झाला आणि चेंडू स्वतःच्याच जाळ्यात गेला. या स्वयंगोलमुळे अर्जेंटिनाला निर्णायक आघाडी मिळाली आणि अखेर त्यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले.

मेसीमुळे आघाडी

सामन्याच्या सुरुवातीपासून अर्जेंटिनाने आक्रमक खेळ केला. २९व्या मिनिटाला लिसांड्रो मार्टिनेझच्या लांब पासवर मेसीने अप्रतिम नियंत्रण मिळवत शानदार फटका मारला आणि चेंडू थेट जाळ्यात धाडला. मेसीचा विश्वचषक कारकीर्दीतील हा २०वा, तर यंदाच्या स्पर्धेतील सातवा गोल ठरला. या गोलनंतर अर्जेंटिनाने वर्चस्व राखले होते. मात्र, पूर्वार्ध संपेपर्यंत त्यांना गोलसंख्येत वाढ करता आली नाही.

डुआर्टेमुळे बरोबरी

उत्तरार्धात केप व्हर्डेने सामन्याचा रंगच बदलून टाकला. डेरॉन डुआर्टेने बॉक्समध्ये अचूक धाव घेत लिसांद्रो मार्टिनेझच्या पायांमधून जोरदार फटका मारत गोल केला. अर्जेंटिनाचा गोलरक्षक एमिलियानो मार्टिनेझला चकवत चेंडू जाळ्यात गेल्यानंतर स्टेडियममधील केप व्हर्डेच्या समर्थकांनी जोरदार जल्लोष केला. अर्जेंटिनाला आघाडीची संधी होती, पण वोझिन्याने त्यांना हताश केले.

अतिरिक्त वेळेत थरार

नियमित ९० मिनिटांनंतर सामना १-१ असा बरोबरीत राहिल्याने अतिरिक्त वेळ खेळवण्यात आली. अतिरिक्त वेळेच्या दुसऱ्याच मिनिटाला ॲलेक्सिस मॅक ॲलिस्टरच्या कॉर्नरवर लिसांद्रो मार्टिनेझने उजव्या कोपऱ्यातून जोरदार किकसह चेंडू गोलजाळ्यात मारला आणि अर्जेंटिनाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. परंतु केप व्हर्डेने हार मानली नाही. १०३व्या मिनिटाला सिडनी लोपेस काब्रालने डाव्या बाजूने आत येत अप्रतिम कर्लिंग शॉट मारला. एमिलियानो मार्टिनेझच्या डोक्यावरून चेंडू थेट गोलच्या वरच्या कोपऱ्यात जाऊन विसावला. या गोलने केप व्हर्डेला बरोबरी करून दिली. मात्र, अतिरिक्त वेळेच्या उत्तरार्धात स्वयंगोलमुळे केप व्हर्डेला पराभव पत्करावा लागला.

मेसीविरुद्ध खेळण्याचे स्वप्न पूर्ण

- लिओनेल मेसीविरुद्ध खेळणे हे माझे स्वप्न आहे, असे विश्वचषक स्पर्धेपूर्वीच्या एका मुलाखतीत केप व्हर्डेचा गोलरक्षक वोझिन्या म्हणाला होता. त्याचे हे स्वप्न पूर्ण झालेच, शिवाय सामन्यानंतर त्याला मेसीकडून कौतुकाची थापही मिळाली.
- "सामना संपल्यानंतर मी मेसीकडे गेलो. त्याने मला मिठी मारली आणि म्हणाला, 'तू अप्रतिम खेळलास. तुझ्या देशातील लोकांना तुझा अभिमान वाटला पाहिजे.' तो क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय होता मेसीसारख्या महान फुटबॉलपटूकडून असे कौतुकाचे शब्द ऐकणे ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. मी त्याचे आभार मानले," असेही वोझिन्या म्हणाला.

मेसीचीच जादू

२०	केप व्हर्डेविरुद्ध मेसीने अर्जेंटिनाचे गोलखाते उघडले. विश्वचषक कारकीर्दीतील २०वा गोल. अशी कामगिरी करणारा पहिला खेळाडू.
८	विश्वचषक स्पर्धेत सलग आठ सामन्यांत गोल करणारा पहिला खेळाडू.
७	दोन विश्वचषक स्पर्धांत सात गोल करणारा पहिला. २०२२ च्या स्पर्धेतही गोलसपाटा.
३०	विश्वचषक स्पर्धेतील ३०वा सामना. सर्वाधिक सामन्यांच्या विक्रमाचा मानकरी. ख्रिस्तियानो रोनाल्डो (२६ सामने) दुसऱ्या स्थानी.

वोझिन्याची भक्कम भिंत : ४० वर्षीय गोलरक्षक वोझिन्या या सामन्यात केप व्हर्डेचा खरा नायक ठरला. त्याने आठ शानदार बचाव (सेव्ह) केले. मेसीसमोरची एकेरी संधी, तसेच त्याच्या फ्री-किकवरही त्याने अप्रतिम झेप घेत गोल वाचवला.

इजिप्तची अचूकता निर्णायक

अर्लिंग्टन : इजिप्तने 'पेनल्टी शूटआऊट'मधील अचूक कामगिरीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाला नमवत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. इजिप्तचा बाद फेरीतील हा पहिला विजय ठरला. शूटआऊटपूर्वी ऑस्ट्रेलियाने गोलरक्षक बदलण्याचा निर्णय घेतला. पॅट्रिक बिचच्या जागी अनुभवी मॅट रायनला मैदानावर उतरविण्यात आले. मात्र, रायनला एकही फटका अडवता आला नाही.

नियमित वेळेतील १-१ अशा बरोबरीनंतर अतिरिक्त वेळेत दोन्ही संघांना गोलसंख्या वाढवता आली नाही. त्यामुळे 'पेनल्टी शूटआऊट'चा अवलंब करण्यात आला. यात इजिप्तने ४-२ अशी बाजी मारली. 'शूटआऊट'मध्ये ऑस्ट्रेलियासाठी जॅक्सन इर्विन आणि अवेर माबिल यांनी गोल केले. मात्र, हॅरी साऊटरचा फटका चुकला आणि १८ वर्षीय लुकास हेरिंग्टनचा फटका गोलपोस्टला लागला. याउलट इजिप्तच्या चारही खेळाडूंनी गोलचा अचूक वेध घेतला. गोल करणाऱ्यांमध्ये महमूद साबिर, रामी राबिया, लिव्हरपूलचा माजी खेळाडू मोहम्मद सलाह आणि होसाम अब्देलमागुइद यांचा समावेश होता. इजिप्तची पुढच्या उपउपांत्यपूर्व फेरीत अर्जेंटिनाशी गाठ पडेल.

त्याआधी, नियमित वेळेत इसाम अशूरने १३व्या मिनिटाला हेडरवर गोल करत इजिप्तला आघाडी मिळवून दिली. ऑस्ट्रेलियाने ५५व्या मिनिटाला बरोबरी साधली. इजिप्तचा बचावपटू मोहम्मद हानी याच्याकडून स्वयंगोल झाला. एकाच विश्वचषकात दोन स्वयंगोल करणारा तो पहिला खेळाडू ठरला. यापूर्वी, बेल्जियमविरुद्ध साखळी लढतीतही हानीकडून स्वयंगोल झाला होता.

सलाह भावुक : इजिप्तचा तारांकित आक्रमक आणि कर्णधार मोहम्मद सलाह स्नायूंच्या दुखापतीनंतरही या सामन्यात खेळला. त्याने 'शूटआऊट'मध्ये थक्क करणारी 'पानेन्का' किक मारत गोल केला. इजिप्तचा विजय निश्चित झाल्यानंतर सलाह भावुक झालेला दिसला.

कोलंबियाचे सातत्य कायम; घानावर मात

वृत्तसंस्था, कॅन्सस सिटी

प्रखर उष्णतेत खेळल्या गेलेल्या सामन्यात जॉन अरियासच्या पूर्वार्धातील निर्णायक गोलच्या जोरावर कोलंबियाने घानाचा १-० असा पराभव करत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. साखळीत दोन विजय आणि पोर्तुगालविरुद्ध बरोबरीची नोंद करणाऱ्या कोलंबियाने बाद फेरीतही हेच सातत्य कायम राखत जेतेपदासाठी दावेदारी अधोरेखित केली आहे.

रात्री उशिरापर्यंत ३० अंश सेल्सियसपेक्षा अधिक तापमान असतानाही नेस्टोर लॉरेन्झो यांच्या मार्गदर्शनाखालील कोलंबियाने संपूर्ण सामन्यावर वर्चस्व राखले. विजयाचा फरक केवळ एका गोलचा असला, तरी प्रत्यक्षात कोलंबियाने अनेक संधी निर्माण केल्या आणि घानाला कायम दडपणाखाली ठेवले. कोलंबियाने सलग तिसऱ्या सामन्यात प्रतिस्पर्ध्याला गोल करण्यापासून रोखले. आता पुढील फेरीत त्यांची स्विट्झर्लंडशी गाठ पडणार आहे.

घानाचे आक्रमण संपूर्ण स्पर्धेत निराशाजनक ठरले. चार सामन्यांमध्ये मिळून घानाने एकूण केवळ चार फटकेच लक्ष्याच्या दिशेने मारले. या विश्वचषकात इराकनंतर हा दुसरा सर्वात खराब आकडा ठरला. याउलट, कोलंबियाने या एकाच सामन्यात घानाच्या संपूर्ण स्पर्धेतील कामगिरीपेक्षा दुप्पट फटके लक्ष्यावर मारले.

दुखापतीचा फटका

सुरुवातीच्या दहा मिनिटांत दोन्ही संघांना दुखापतींचा मोठा फटका बसला. कोलंबियाचा आघाडीचा खेळाडू जॉन कॉर्डोबा याला स्नायूची दुखापत झाल्याने त्याला मैदान सोडावे लागले. दुसरीकडे घानाचा उजवा बचावपटू मार्विन सेनाया पायाच्या दुखापतीमुळे बाहेर पडला.

अरियासची चमक

कॉर्डोबाच्या जागी आलेल्या लुईस सुआरेझने १४व्या मिनिटाला उजव्या बाजूने वेगवान धाव घेत अचूक क्रॉस दिला. दूरच्या पोस्टजवळ असलेल्या अरियासने वावर अप्रतिम व्हॉली मारत चेंडू जाळ्यात धाडला. घानाचा बचावपटू सेइदूचे अरियासकडे दुर्लक्ष झाले आणि बचावातील ही चूक त्यांना महागात पडली.

गोल स्वीकारल्यानंतर घानाने काही प्रमाणात आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. मँचेस्टर सिटीचा आक्रमक अँटोईन सेमेन्योचा फटका बचावपटूला लागून बाहेर गेला. संपूर्ण स्पर्धेत त्याला एकदाही लक्ष्यावर फटका मारता आला नाही. मध्यंतरानंतरही कोलंबियाचेच वर्चस्व राहिले आणि त्यांनी सहज विजय नोंदवला.

विश्वचषक उपउपांत्यपूर्व फेरी आजचे सामने

- ब्राझील वि. नॉर्वे **वेळ : मध्यरात्री १.३० वा. (सोमवार)**
- इंग्लंड वि. मेक्सिको **वेळ : पहाटे ५.३० वा. (सोमवार)**
- **थेट प्रक्षेपण : 'युनाइटट स्पोर्ट्स', 'झी ५'**

HINDUJA LEYLAND FINANCE

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड

कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): यू६५९९३एमएच२००८पीएलसी१८४२२१

नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. सी-२१, टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१

कॉर्पोरेट कार्यालय: 27ए, डेक्कलॅड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई, तामिळनाडू - ६०००३२

टेली.: (०४४) २२४२७५२५; **वेबसाईट:** https://hindujaleylandfinance.com/;

ईमेल: investorrelations@hindujaleylandfinance.com

नमुना क्र. सीएए.२

[कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३०(३) आणि कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ व ७ च्या अनुषंगाने]

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांचे समक्ष कंपनी योजना अर्ज सी.ए. (सी.ए.ए.) /१०७/एमबी/२०२६

कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात
आणि
कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ सह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या प्रकरणात
आणि
हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड आणि एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण योजनेच्या प्रकरणात

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींतर्गत स्थापित कंपनी आणि)
कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत अस्तित्वात असलेली कंपनी, नोंदणीकृत कार्यालय, प्लॉट क्र. सी-२१,)
टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५१.)
CIN: यू६५९९३एमएच२००८पीएलसी१८४२२१) .....पहिली अर्जदार कंपनी / हस्तांतरकर्ता कंपनी

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड च्या असुरक्षित धनकोंची सभा घेण्यात येणार असल्याची सूचना व सूचनेची जाहिरात

याद्वारे **सूचित** करण्यात येते की माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (''**माननीय न्यायाधिकरण**'') यांनी कंपनी योजना अर्ज क्र. सी.ए. (सीएए)/१०७/एमबी/२०२६ मध्ये पारित केलेल्या दि. १७ जून, २०२६ च्या आदेशान्वये (''**आदेश**'') त्यांनी इतर बाबींशिवाय असे निर्देश दिले की **हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड** (**हस्तांतरकर्ता कंपनी**'' **किंवा** ''**कंपनी**'') च्या सुरक्षित धनकोंची सभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग किंवा इतर दृकश्राव्य पद्धतीनी (**व्हीसी/ओएव्हीएम**'') (''**सभा**') घेण्यात यावी ज्यात हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड ते एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण करण्याची प्रस्तावित योजना (''**योजना**'') विचारात घेण्यात यावी, आणि योग्य वाटत असल्यास, बदलांसह किंवा बदलांशिवाय मंजूर करण्यात यावी.

माननीय एनसीएलटी यांचा सदर आदेश आणि त्यातील निर्देशांच्या अनुषंगाने कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ आणि त्याअंतर्गत इतर लागू नियमांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ (''**अधिनियम**'') मधील तरतुदींचे, आणि व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून आमसभा घेण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने जारी केलेल्या लागू सामान्य परिपत्रकांचे पालन करीत असुरक्षित धनकोंची आमसभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता घेण्यात येणार आहे आणि इंस्टीट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मीटींग्ज (''SS-2'') आणि सदर नियमांसह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील लागू तरतुदींचे पालन करीत असुरक्षित धनकोंना ई-मतदान सुविधा देण्यात आहे. ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून राबविण्यात येणार असल्याने समभागधारकांनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही.

कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि दि. ०४ जुलै, २०२६ रोजीच्या सदर सूचनेची संबंधित जोडपत्रे यांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १०२ आणि सदर अधिनियमातील इतर लागू तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद २३०(३) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार दि. २६ जून, २०२६ रोजी त्या सभासदांचे ई-मेल ॲड्रेस कंपनी/डिपॉझिटरीज, डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स (DPs) / कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्स्फर एजंट - केफिन टेक्नोलॉजीज लिमिटेड / एमयुएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''**आरटीए**'') यांचेकडे आधीच नोंदविलेले आहेत त्यांना वर नमूद दि. ०४ जुलै, २०२६ रोजीची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे.

हस्तांतरकर्ता कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''**एनएसडीएल**'') च्या www.evoting.nsdl.com येथे योजनेसह खुलासापर विवरण आणि संबंधित जोडपत्रांसह सदर सूचनेची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

कुणाही असुरक्षित धनकोस सूचना, खुलासापर विवरण आणि इतर दस्तावेजांची छापील प्रत हवी असल्यास त्यासाठी ते हस्तांतरकर्ता कंपनीकडे २७ ए, डेक्कलॅड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - ६०००३२, तामिळनाडू येथे विनंती पाठवू शकतात आणि हस्तांतरकर्ता कंपनी त्या असुरक्षित धनकोच्या नोंदणीकृत पत्त्यावर ते पाठवेल. त्याशिवाय, असुरक्षित धनको वर नमूद दस्तावेज सभा सुरु होण्यापूर्वी 48 तासांपर्यंत हस्तांतरकर्ता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून सर्व कामकाजाच्या दिवशी (शनिवार व रविवार सोडून) स. ११ (भाप्रवे) ते दु. १.०० वाजेपर्यंत (भाप्रवे) निशुल्क प्राप्त करू शकतात.

www.hindujaleylandfinance.com या कंपनीच्या वेबसाईटवर गुंतवणूकदार विभागांतर्गत सूचनेत नमूद केल्यानुसार दस्तावेजांची इलेक्ट्रॉनिक प्रत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून घेण्यात येत असल्याने असुरक्षित धनकोंनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार, सदर सभेसाठी हस्तांतरकर्ता कंपनीच्या असुरक्षित धनकोंनी प्रतिनिधी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध नाही. एनसीएलटी द्वारे भरविण्यात येणाऱ्या या सभेचे अध्यक्ष म्हणून माननीय न्यायाधिकरण यांचेद्वारे श्री देवी प्रसाद सेमवाल, आयआरएस (निवृत्त) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर अधिनियमातील अनुच्छेद २३०(६) नुसार कंपनीच्या आवश्यक बहुसंख्य असुरक्षित धनकोंनी ही योजना मंजूर केल्यास ती माननीय न्यायाधिकरण आणि आवश्यक वाटेल त्यानुसार इतर कोणत्याही नियामक किंवा वैधानिक प्राधिकरणे यांचेकडून इतर मंजुऱ्या, परवानग्या आणि संमतीच्या अधीन असेल.

ई-मतदान:

एनसीएलटी यांच्या आदेशामधील तरतुदी आणि सुधारित कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १०८ आणि इतर लागू तरतुदी, SS-2, आणि ई-मतदानाच्या माध्यमातून आमसभा भरविण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने विहित केलेल्या आवश्यकतांच्या अनुषंगाने कंपनीद्वारे आपल्या असुरक्षित धनकोंना सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदान आणि सभा सुरु असताना एनएसडीएल द्वारे उपलब्ध करून देण्यात येणारी ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेस उपस्थित होण्याची आणि ई-मतदानाची तपशीलवार प्रक्रिया सभेच्या सूचनेचा भाग आहे. दूरस्थ ई-मतदानाशी संबंधित महत्त्वाचे तपशील खाली देण्यात आलेले आहेत:

ई-मतदानासाठी कट-ऑफ दिनांक	२३ जुलै, २०२६ (गुरुवार)
दूरस्थ ई-मतदान कालावधी सुरु होणे	२७ जुलै, २०२६ (सोमवार) रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे)
दूरस्थ ई-मतदान कालावधी समाप्ती	२९ जुलै, २०२६ (बुधवार) रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे)

त्यानंतर एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल. कंपनीद्वारे सभेमध्येसुद्धा ई-मतदानाची सुविधा देण्यात येत आहे. असुरक्षित धनकोंचे मतदान हक्क कट-ऑफ दिनांकास म्हणजे २३ जुलै, २०२६ रोजी त्यांच्या थकबाकीच्या मूल्याच्या गुणोत्तराच्या प्रमाणात असतील. कट-ऑफ दिनांकास ज्या व्यक्तीचे नाव कंपनी / आरटीए कडे असुरक्षित धनको म्हणून नोंदविलेले असेल त्यांनाच मतदान करता येईल.

असुरक्षित धनकोंना सभा सुरु असताना ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी (सभेच्या अगोदर) दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून त्रयावर मतदान केलेले नसेल त्यांना सभेत त्या त्रयावर मतदान करता येईल. सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून त्रयावर मतदान करणारया असुरक्षित धनकोंना व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होता येईल, परंतु त्या त्रयावर पुन्हा मतदान करता येणार नाही. सभेच्या दिवशी सभा संपल्यानंतर १५ मिनिटांनी एनएसडीएल द्वारे ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल.

कट-ऑफ दिनांकानंतर कंपनीचे असुरक्षित धनको होणाया एखाद्या व्यक्तीस सभेचे कामकाज पाहायचे असल्यास ते त्यासाठी एनएसडीएल यांचेकडे evoting@nsdl.com येथे किंवा कंपनी/आरटीए कडे विनंती करून लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतात. परंतु, अशा व्यक्तीस त्रयावर मतदान करता येणार नाही.

ज्या असुरक्षित धनकोंनी आपले ई-मेल ॲड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना विनंती आहे की ते डीमॅट स्वरुपात समभाग धारण करीत असल्यास त्यांनी ते डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडे नोंदवावेत. ज्या असुरक्षित एनसीडी धारकांचे ईमेल ॲड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना विनंती आहे की त्यांनी कंपनीकडून पत्त्यावर सभेची सूचना पाठविण्यात येत आहेत.

माननीय न्यायाधिकरण यांनी दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया तसेच सभा सुरु असताना ई-मतदान योग्य व पारदर्शक पद्धतीने पार पडावे यासाठी परिनिरीक्षण करण्यासाठी हस्तांतरकर्ता कंपनीचे परिनिरीक्षक म्हणून आणि सभा समाप्त झाल्यापासून ३ (तीन) दिवसांचे आत झालेल्या मतदानाबाबत सभेच्या अध्यक्षांकडे किंवा अध्यक्षांनी अधिकृत केलेल्या कुणाही व्यक्तीकडे अहवाल सादर करण्यासाठी प्रणव डी. वैद्य & कं., कंपनी सचिव, व्यवसाय परवाना क्र. ४३३९ यांची नियुक्ती केलेली आहे.

त्यानुसार, असुरक्षित धनकोंना विनंती आहे की त्यांनी वर नमूद पद्धतीने, दिनांकास व वेळी सभेस उपस्थित व्हावे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होणाया असुरक्षित धनकोंची उपस्थिती सदर अधिनियमातील अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमसाठी ग्राह्य धरण्यात येईल. सभा सुरु होताना सभेसाठी सदर उल्लेखित कोरम उपस्थित नसल्यास सभा ३० मिनिटांसाठी बरखास्त करण्यात येईल, त्यानंतर, उपस्थित असुरक्षित धनको हेच कोरम आहे असे समजण्यात येईल.

०१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत मतदानाचे निकाल कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि एनएसडीएल च्या वेबसाईटवर www.evoting.nsdl.com येथे प्रदर्शित करण्यात येतील, शिवाय बीएसई लिमिटेड यांचेकडेसुद्धा पाठविण्यात येतील.

काही प्रश्न / तक्रारी असल्यास, असुरक्षित धनको सदरची माहितीसाठी सहत्रा विचारणारा येणारे प्रश्न (''FAQs'') पाहू शकतात किंवा १८०० २२२ ९९० वर कॉल करू शकतात किंवा www.evoting.nsdl.com येथे विनंती पाठवू शकतात किंवा एनएसडीएल च्या पत्त्यावी म्हाते यांचेशी evoting@nsdl.com येथे संपर्क साधू शकतात.

स्वा/-
देवी प्रसाद सेमवाल
सभेसाठी नियुक्त अध्यक्ष

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

कॉर्पोरेट कार्यालय, लेखापाल, चौकशी ज्योती, एलबावरी बिल्डिंग, अॅनेक्सीयर रोड, जुना पेन्शनर मार्ग, इंदिरा नगर, लखनऊ - २२६०१२.
दूरध्वनी क्र.०५२४८२-२४०१५८,५९ ई-मेल : pln_lat@mahabank.co.in

सार्वजनिक आवाहन

नामनिर्देशन (Nomination) करा –
आपल्या कुटुंबाच्या सुरक्षित भविष्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल

प्रिय ग्राहक हो,

बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या सर्व माननीय ग्राहकांना विनम्र आवाहन करते की, आपल्या बचत खाते, चालू खाते, मुदत ठेव (FD), आवर्ती ठेव (RD) तसेच इतर पात्र खात्यांमध्ये अद्याप नामनिर्देशन (Nomination) केले नसेल, तर कृपया त्वरित करून घ्यावे.

नामनिर्देशन ही अत्यंत महत्त्वाची सुविधा असून, वेळेतराच्या दुर्दैवी निधनानंतर खात्यातील रक्कम किंवा ठेव योग्य व्यक्तीपर्यंत सुलभ व जलद पद्धतीने पोहोचण्यास मदत करते. यामुळे आपल्या कुटुंबाला अनावश्यक अडचणी, विलंब आणि कायदेशीर प्रक्रियेपासून दिलासा मिळतो.

आपण अद्याप नामनिर्देशन केले नसल्यास किंवा विद्यमान नामनिर्देशनात बदल अथवा अद्ययावत करावयाचे असल्यास, कृपया आपल्या जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेला भेट द्या. आमचे अधिकारी व कर्मचारी आपणास आवश्यक सहकार्य करतील.

आजच नामनिर्देशन करा – आपल्या कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेची खात्री करा.

नामनिर्देशन ही केवळ औपचारिकता नाही, तर आपल्या कुटुंबाप्रती असलेली जबाबदारी आहे.

आजच आपल्या जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेला भेट द्या.

इन्स्टिट्यूट फॉर डिझाईन ऑफ इलेक्ट्रिकल मेजरींग इंन्स्ट्रुमेंट्स
एम एस एम ई - टेक्नॉलॉजी सेंटर, मुंबई
सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार

प्रवेश सुरु शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पात्रता १० वी पास

AICTE & MSBTE - **मान्यताप्राप्त ३ वर्षीय डिप्लोमा कोर्सेस**

डिप्लोमा इन टुल एंड डाई मेकींग (Mechanical)
मेकॅनिकल इंजिनीअरींग साठी (MSBTE EQUIVALENCE)
प्रात्यक्षिकांवर आधारीत टुल डीझाईन आणि टुल निर्मितीचे प्रशिक्षण दिले जाते.
अधिक माहीती साठी संपर्क साधा : 8976300878 / 7021221498

डिप्लोमा इन ३डी एनिमेशन एंड ग्राफीक्स
इंफोरमेशन टेक्नोलॉजी (IT) इक्वीव्हॅलीन (MSBTE EQUIVALENCE)
हॅन्ड्स ऑन प्रॅक्टिकल ट्रेनिंग ग्राफिक्स डिझाईन, एडिटिंग, ॲनिमेशन, गेम इंजिन, स्पेशल इफेक्ट्स,फिल्म कम्पोझिटिंग, एडिटिंग आणि UX / UI Design, AR / VR Game Design, Generative AI
अधिक माहीती साठी संपर्क साधा : 9821473895 / 8291437525

डिप्लोमा इन रोबोटीक्स एंड मेकेट्रोनिक्स
मेकॅनिकल इंजिनीअरींग साठी (MSBTE EQUIVALENCE)
प्रात्यक्षिकांवर आधारीत मेकाट्रोनिक्स, रोबोटीक्स, ऑटोमेशन आणि एम्बेडेड सिस्टम्स, डिझाईन एंड डेव्हलपमेंट प्रशिक्षण दिले जाते.

प्रशिक्षण संस्था सी सर्टिफाईड SCST
अधिक माहीती साठी संपर्क साधा : 9819495547 / 9833292670
ऑनलाईन लिंक https://idemi.org/training/aicte
आयडीईएमआय, इरर्ल्न एक्सप्रेस हायवे, सुन्नाभाटी सायन, मुंबई
फोन.: ०२२ २४०५२४०१/२/३/४ EXT.No. २१३ / Email: training@idemi.org | Website: www.idemi.org

हे पत्र वैरेती ठक्कर यांनी मालक व प्रकाशक एक्स